दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार,दि.२६ एप्रिल २०२५ | वर्षे४थे | अंक२५४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# खडकतमध्ये तणाव!!

दगडफेकीत अनेकजण जखमी, ४५ आरोपी निष्पन्न ▶ झेंडा काढण्याच्या कारणावरून दोन गट भिडले ▶ पोलिसांचा सल्ला न मानता एकमेकांवर दगडफेक ▶ आष्टीचे पोनि भुतेकर घटनेला जबाबदार: वंचित

पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टी:खडकत येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात झेंडा काढण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाला. यावेळी दोन्ही गटात दगडफेकही झाली. या वादाची माहिती मिळताच आष्टी पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि अंमलदार घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी दोन्ही समाजातील लोक लाठ्या-काठ्या घेऊन एकत्र जमले होते. पोलिसांनी समजावण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांचा सल्ला न मानता एकमेकांवर दगडफेक आणि लाठीकाठ्यांनी मारहाण सुरू केली. पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठा अनुचित प्रकार टळला. पोलिसांनी जमाव पांगवून परिस्थिती काही मिनीटातच नियंत्रणात आणली. यातील ४५ आरोपी निष्पन्न झाले असून पोलिसांनी २३ जणांना अटक केली आहे.

बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटना वारंवार घडत आहेत. त्यातच हत्या प्रकरण आणि खोक्या प्रकरण ताजे असतानाच आता बीड जिल्ह्यातील आष्टीतील खडकत गावात दोन गट परस्परांशी भिडले, आष्टीच्या खडकत गावामध्ये एका चौकात झेंडा लावण्या ▸ पान २ वर



### कायदा हातात घेऊ नका



पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी नागरिकांना विनाकारण कायदा हातात न घेण्याचे आणि अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. कायदा तोडणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे वाद वाढला



२४ एप्रिल रोजी संध्याकाळी खडकत येथील पीडित युवक-महिला गुन्हा दाखल करण्यासाठी आष्टी पोलीस स्टेशन या ठिकाणी गेले होते. परंतु त्या ठिकाणचे पोलीस निरीक्षक भुतेकर यांनी गुन्हा दाखल करून घेतला नाही. संबंधित लोकांना वापस पाठवले २५ एप्रिल रोजी सकाळी विशिष्ट समूहाच्या लोकांनी दलित वस्तीवर हल्ला चढवला व अमानुष मारहाण केली. पोलीस प्रशासन कॉम्बिंग ऑपरेशनच्या नावाखाली दलित युवकांनाच अटक करत आहेत. मुख्य आरोपींना अटक केले नाही. प्रकरणी जबाबदार पोलीस निरीक्षक भुतेकर यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

-अजय सरवदे,जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड

# तिन्ही सैन्य दल हायअलर्टवर!

सतर्क:उत्तर काश्मिरात राफेलच्या घिरट्या



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याचा बदला घेतला जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरपणे बोलून दाखवले. या पार्श्वभूमीवर भारताचे तिन्ही सैन्यदल हायअलर्टवर आहे. अचानक काही घडलेच तर त्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारताचे वायूदल, भूदल, नौदल सज्ज झाले. दरम्यान, उत्तर काश्मीरमध्ये रात्रीपासून राफेल विमान घिरट्या घालत आहे. राजस्थान बॉर्डरवरील बीएसएफ फौजांनाही सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. यासोबतच लष्कर प्रमुखांकडून नियंत्रण रेषेचा आढावा घेण्यात आला. त्यामुळे काही तरी मोठे घडणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

भारतीय सेनेकडून युद्धासाठीची रणनीती आणि शस्त्राभ्यास याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. पाकिस्ताजवळील एलओसीवर सर्वात पुढे भारतीय भूदलाचे सैनिक असतात. पहलगाम घटनेनंतर भूदल अलर्ट मोडवर गेले आहे. भूदलाने राजस्थानमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी युद्धाभ्यास केला आहे. भारतीय सेनेने याला नियमित युद्धाभ्यास असल्याचे सांगितले आहे. मात्र, सध्याच्या पार्श्वभूमीवर सैनिकांनी तयारी केली आहे.भारतीय भूदलातर्फे व्हिक्टर फोर्स, राष्ट्रीय रायफल्स, पॅरा स्पेशल पोर्स यूनिटसला दक्षिण काश्मीर आणि एलओसीच्या आसपास तैनात करण्यात आले आहे. ▸ पान २ वर

# मराठवाड्यातील युवा सेनेला बळ

बाजीराव चव्हाण: हजारो युवासैनिकांची फौज उभा



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, शिवसेना पक्षाचे मुख्य नेते व महाराष्ट्राचे लाडके लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, खासदार, श्रीकांत शिंदे साहेब, तसेच युवासेनेचे कार्यध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब, यांच्या मार्गदर्शनाने माझ्यावर मराठवाड्याची युवासेना वाढवण्याची मोठी जबाबदारी वरिष्टांनी मोठ्या विश्वासाने माझ्यावर सोपवली आहे. त्यामुळे मी वरिष्ठांनी मला सोपवलेल्या जबाबदारीचा मी पूर्णपणे मराठवाडा युवासेना निरीक्षक पदाला मान देऊन. आपली कामगिरी कर्तव्याने पार पाडण्यासाठी मराठवाड्यात युवासेना वाढवून, गावागावात, शहरातील सामान्य घरातील युवकांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना योग्य ती जबाबदारी देऊन. जनसामान्यांच्या सेवेसाठी, येणाऱ्या काळात युवा सेना वाढवून मराठवाड्यात हजारो युवकांची फौज उभा रून राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या मनगटात बारा हत्तीचे बळ देण्याच काम मराठवाड्यातील युवासेना करत आहे.

मी आदरणीय मा. एकनाथ शिंदे साहेबांचा ऋणी आहे. साहेबांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी मराठवाड्यातील युवा सेना बळकट करून सार्थ करून दाखवन्यासाठी प्रयत्नशील आहे. आणि पुढे ही मराठवाड्यातील युवासेना वाढवून. राज्यात शिवसेना, युवासेना वाढीसाठी मराठवाडा युवासेनेच्या माध्यमातून दिवसाची रात्र एक करून येणाऱ्या काळात राज्यात ▸ पान २ वर

# मेधा पाटकर यांना अटक

अवमान प्रकरण:नवीन याचिका दाखल करण्याची परवानगी

पुण्यभूमी प्रतिनिधी



दिल्ली:सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. दिल्लीचे विद्यमान नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांच्या अवामनप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. मानहानीच्या प्रकरणात त्यांना दक्षिण पूर्व दिल्लीतून अटक करण्यात आली आहे. एलजी विनय सक्सेना यांनी मेधा पाटकर यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. मेधा पाटकर यांना दुपारी साकेत न्यायालयात हजर केले जाईल. मेधा पाटकर यांच्या वकिलाने दिल्ली उच्च न्यायालयातून त्यांची याचिका मागे घेतली आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाने मेधा पाटकर यांच्या वकिलाला नवीन याचिका दाखल करण्याची परवानगी दिली आहे. मेधा पाटकर यांच्या नवीन याचिकेवर आज दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. प्रोबेशन बॉन्ड सादर करण्याच्या आणि १ लाख रुपयांचा दंड भरण्याच्या आदेशाचे जाणूनबुजून उल्लंघन केल्याबद्दल साकेत न्यायालयाने मेधा पाटकर यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी केले. मेधा पाटकर यांनी कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या एनडब्ल्यूबीच्या आदेशाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मानहानीच्या प्रकरणात साकेत न्यायालयाने जारी केलेले अजामीनपात्र वॉरंट बजावून दिल्ली पोलिसांनी मेधा पाटकर यांच्या अटकेची कारवाई केली.त्या जाणूनबुजून न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करत आहेत, त्यांचा हेतू स्पष्ट आहे असे कोर्टाने नमूद केलं. न्यायालयात हजर राहणे त्या टाळत आहेत आणि ▸ पान २ वर

# २३ राज्यांना अतिवृष्टीचा इशारा

हवामान:महाराष्ट्रात उष्णता वाढली

पुण्यभूमी प्रतिनिधी



पुणे:देशात पुन्हा एकदा वातावरणात मोठा बदल झाला आहे. एकीकडे देशातील अनेक भागांना उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसत आहे, तर दुसरीकडे २३ राज्यांना अतिवृष्टी आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.उत्तर आणि पश्चिम भारतामध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वेस्टर्न डिस्टबन्समुळे जम्मू-कश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांमध्ये २५ आणि २६ एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.बांगलादेश आणि आसामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, त्यामुळे पूर्व भारतात वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार पाऊस पडू शकतो असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मिझोरम, नागालँड, या राज्यांमध्ये पुढील सात दिवस जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

तसेच या राज्यांमध्ये वादळे देखील होणार असून, या काळात ताशी ६० ते ७० किमी प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे, या पार्श्वभूमीवर आयएमडीकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला ▸ पान २ वर

# बीडमध्ये एसडीपीआयच्या पुढाकाराने कँडल मार्च, नागरिकांचा मोठा सहभाग

बीड/प्रतिनिधी

सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या (SDPI) बीड जिल्हा शाखेच्या वतीने जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी बीड शहरात कँडल मार्चचे आयोजन करण्यात आले. हा मोर्चा कारंजा चौक येथून सुरू होऊन बशीरगंज येथे समाप्त झाला.

या शांततेच्या कँडल मार्चमध्ये एसडीपीआयचे जिल्हा कन्वेनर आबेद अब्बास साहेब, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे (खचखच्) बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ, भागवत तावरे, राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी (शरद पवार) शहराध्यक्ष खुर्शीद आलम साहेब, मॅडम गुलफिरेज बाजी यांनी विशेष सहभाग घेतला.मोर्चात बीड शहरातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते, तसेच मोठ्या संख्येने जागरूक नागरिक, महिलावर्ग आणि बहुसंख्य माताभगिनी सहभागी झाल्या होत्या.दहशतवाद्यांच्या या भ्याड कृत्याचा सर्व स्तरांतून निषेध व्यक्त केला जात असून, देशात शांतता, एकता आणि सौहार्द जपण्याचा संदेश या कँडल मार्चद्वारे देण्यात आला.




प्रा.राजू कोकलगांवे

परळीत महात्मा बसवण्णा जयंती

# महात्मा बसवण्णा लिंगायत क्रांतीचे जनक!

पुण्यभूमी प्रतिनिधी

...म्हणून बसवेश्वरांचे साहित्य जगभर पोहोचले:चेतन सौंदळे



परळी:बाराव्या शतकातील लिंगायत क्रांतीचे जनक महात्मा बसवण्णा यांनी समाजात समतेची बीजे पेरली, असे मत प्रा.राजू कोकलगावे यांनी व्यक्त केले. तर बसवेश्वरांच्या अनुभव मंटपातील वचनांचा अनुवाद झाल्यास त्यांचे साहित्य जगभर पोहोचू शकेल, असे सामाजिक कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक चेतन सौंदळे यांनी प्रतिपादन केले.

ते परळी वैजनाथ येथे महात्मा बसवेश्वर यांच्या ९२० व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. महात्मा बसवण्णांनी पेरलेल्या समतेच्या बीजांमुळे समाजात महत्त्वपूर्ण बदल झाले. लिंगायत धर्माला मानणारा वर्ग हा एक मोठा आणि प्रभावी समुदाय बनला, ज्याने सामाजिक समानतेच्या मूल्यांना महत्त्व दिले. त्यांच्या विचारांचा प्रभाव केवळ त्या काळापुरता मर्यादित नव्हता, तर आजही तो आपल्याला जाणवतो. सामाजिक न्याय आणि समानतेसाठी लढणाऱ्या अनेक चळवळींना त्यांच्या कार्यापासून ▸ पान २ वर

# ठाण मांडलेल्या पोलिसांच्या बदल्या

एसपी:अवैध धंद्यांविरुद्ध कठोर कारवाई

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड: जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन खबरदारीने प्रयत्न करीत आहे. गुन्हेगारी नियंत्रीत करण्यासाठी सर्व टीमसह प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. येत्या काही दिवसात जिल्ह्यातील अवैध धंदे पूर्णपणे बंद करण्यात येतील अशी ग्वाही जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिली. या संदर्भात बोलतांना काँवत म्हणाले, जिल्ह्यात गुन्हेगारी नियंत्रणात आणण्या संदर्भात प्रथम प्राधान्याने आपण रुजू झाल्यापासून काम सुरु आहे. गुन्हेगारी, माफियागिरी आणि गुंडगिरी कमी करण्याचा ▸ पान २ वर

एकाच ठिकाणी तीन वर्षे उपविभागात १२ वर्षे आणि स्वत:चा तालुका असलेल्या सर्वांच्या गरज असलेल्या ठिकाणी बदल्या करण्यात येणार आहेत. यापुर्वी अनेक वर्षे एकाच ठिकाणी असल्यामुळे ठाणे निहाय असमतोल निर्माण झालेला आहे. जिल्ह्यातील गुन्ह्याच्या प्रमाणानुसार मान्य पदाच्या अधीन राहून नियुक्त्या करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक काँवत म्हणाले.

## दहशतवा ठेचून काढा

भारतात गत दशकभरात काश्मीर वगळता देशाच्या इतर भागात मोठा दहशतवादी हल्ला घडून आलेला नाही, हे आपल्या सुरक्षा यंत्रणांचे, पोलिस प्रशासनाचे, गुप्तचर यंत्रणांचे आणि पर्यायाने शासनाचे मोठे यश आहे असे म्हटले जाते. परंतु याचा अर्थ दहशतवाद संपुष्टात आला असे नाही. आधुनिक जगतात दहशतवाद हा केवळ सुरक्षेशी संबंधित प्रश्न न राहता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थैर्यासाठी मोठा धोका ठरत आहे. अलिकडे प्रसिद्ध झालेल्या जागतिक दहशतवाद निर्देशांक २०२५ नुसार दहशतवादाचा धोका कमी झालेला नाही. उलट त्याच्या स्वरूपात लक्षणीय बदल झाला आहे. जागतिक दहशतवाद निर्देशांक २०२५ मध्ये भारताचा क्रमांक १४ वा आहे. भारताची स्थिती पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या तुलनेत बरी असली तरी भारत पूर्णपणे दहशतवादमुक्त नाही.सीमापार दहशतवाद ही भारतासाठी आजही मोठी समस्या आहे, जी प्रामुख्याने पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी संघटनांमार्फत चालवली जाते. जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तैयबा आणि हिज्बुल मुजाहिद्दीन सारख्या संघटना जम्मू-काश्मीरमध्ये अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत. अलिकडे सुरक्षा दलांनी ऑपरेशन 'ऑल आऊट' सारख्या मोहिमेद्वारे काही प्रमाणात यश मिळवले असले तरी पाकिस्तान पुरस्कृत घुसखोरी आणि कट्टरतावादी कारवाया अद्यापही सुरू आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे मंगळवारी पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेला भ्याड हल्ला. पहलगाम हल्ल्याची तुलना हमासने इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्याशी होऊ लागली आहे. त्यामुळे आता पाकिस्तानविरोधात लष्करी कारवाई करण्यासाठी सरकारवर दबाव वाढू लागला आहे. पहलगाममध्ये हिंदू धर्मियांना वेचून लक्ष्य केल्याचे स्पष्ट झाले आहे. बैसरनमध्ये मंगळवारी झालेल्या हल्ल्यात सात दहशतवाद्यांचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून त्यातील चार ते पाच जण हे पाकिस्तानातून घुसखोरी करून आले असल्याची शक्यता आहे. हल्लेखोरांच्या शरीरावर कॅमेरे लावण्यात आल्याची शंकाही जम्मू-काश्मीरमधील एका पोलिस अधिका-याने बोलून दाखवली. हल्लेखोरांसमवेत किमान दोन स्थानिक अतिरेकी असावेत असाही अंदाज आहे.

गत काही वर्षांपासून अशा हल्ल्यांमध्ये अतिरेक्यांच्या कपड्यांवर किंवा त्यांच्या बंदुकांवर कॅमेरे लावलेले असतात. नरसंहाराचे चित्रीकरण करून त्याचा दुरुपयोग केला जातो. पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांचा बळी गेल्याने त्याचा बदला घेण्याची संतप्त लोकभावना व्यक्त होत आहे. हल्ल्याच्या निषेधार्थ काश्मीरमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. गत ३५ वर्षांत काश्मीरमध्ये असे कधी घडले नव्हते. पहलगाम हल्ल्याविरुद्ध कडक कारवाई केली जाईल. दहशतवाद्यांना सोडले जाणार नाही. भारत योग्य वेळी प्रत्युत्तर देईल. दहशतवादाविरुद्ध आमचे शून्य सहनशीलतेचे धोरण आहे, अशा शब्दांत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी संताप व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून तातडीने भारतात परतले. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. राजधानीत दिवसभर उच्चस्तरीय बैठकांचा सिलसिला सुरू होता. सुरक्षा यंत्रणांनी तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांची स्केचेस प्रसिद्ध केली असून त्यांची पहलगाम जंगलात नाकाबंदी करून कसून शोध घेतला जात आहे.पंतप्रधान मोदी यांनी दिल्ली विमानतळावरच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ, जनरल अनिल चौहान, तिन्ही लष्करी दलांचे प्रमुख, संरक्षण सचिव आणि लष्करी संचालनालय प्रमुख यांची बैठक घेऊन सुरक्षेचा आढावा घेतला. तसेच लष्कराला युद्धाच्या तयारीत राहण्याचे आणि दहशतवादविरोधी कारवायांची मोहीम तीव्र करण्याचे आदेश दिले. कलम ३७० हटवल्यानंतर काश्मीरमध्ये पहिल्यांदाच इतका मोठा दहशतवादी हल्ला झाला आहे. दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांना योग्य उत्तर देणे आता अनिवार्य बनले आहे. दहशतवादाविरुद्ध लढण्याची प्रतिज्ञा घेण्यासोबतच ती साध्य करण्यासाठी ठोस रणनीती आखावी लागेल. पाकिस्तानमधील तळांवरून कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटनांनी सुरक्षा दलाच्या छावण्यांवर हल्ला करण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांवरील हल्ल्यांची रणनीती अवलंबण्यास सुरुवात केली आहे. यामागील हेतू पर्यटन वा इतर कारणांसाठी काश्मीरमध्ये येणा-यांमध्ये भीती निर्माण करणे हा आहे. दहशतवाद्यांनी केवळ पर्यटकांनाच मारले नाही, तर काश्मिरी जनतेच्या पोटावरही लाथ मारली आहे. या भयंकर हल्ल्यानंतर खो-यातील पर्यटनाशी संबंधित व्यवसायही जवळपास ठप्प होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने पाकिस्तानची नाकेबंदी करण्यास सुरुवात केली आहे.भारताने या हल्ल्यानंतर पाकिस्तानवर थेट आरोप केला असून पाकिस्तानी दूतावास बंद करण्यास सांगितले आहे. पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. अटारी चेकपोस्ट बंद करण्यात आला आहे. १९६० साली लागू झालेला सिंधू पाणी करार भारताने रद्द केला आहे. पाकिस्तानवर याचा मोठा परिणाम होणार आहे. 'सार्क'अंतर्गत पाकिस्तानी नागरिकांना देण्यात येणारी व्हिसा सूट रद्द करण्यात आली आहे. भारतात राहणा-या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे. भारतातील सर्व पाकिस्तानी लष्करी सल्लागारांनाही एका आठवड्याच्या आत भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे. पाकिस्तानची २३ टक्के अर्थव्यवस्था आणि ३४ टक्के कर्मचारीवर्ग सिंधू नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे. पाकिस्तानच्या एकूण पाण्यापैकी ८५ टक्के पाणी सिंधू आणि तिच्या उपनद्यांमधून येते.भारताच्या पाणीबंदीमुळे पाकिस्तानातील शेती, उद्योग आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होणार आहे. पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला हा धक्का इतका मोठा असेल की त्यामुळे सामाजिक अस्थिरता आणि आंतरराष्ट्रीय तणाव वाढू शकेल. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार पाण्याचा प्रवाह रोखणे हे युद्धाचे कारण ठरू शकते. भारताचा हा निर्णय केवळ पाकिस्तानपुरता मर्यादित नाही.

# ट्रामा केअर सेंटर सुरु करावे

## निवेदन: मराठी पत्रकार परिषदेचा पुढाकार

पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा: शहरात अपघातग्रस्त आणि अत्यवस्थ रुग्णांसाठी तातडीच्या उपचारांची आवश्यकता लक्षात घेता ट्रामा केअर सेंटर सुरू करण्याची मागणी दिवसेंदिवस तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर मराठी पत्रकार परिषदेच्या पाटोदा शाखेने पुढाकार घेत, येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रामा केअर सेंटर तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी केली आहे.

पत्रकार परिषदेमार्फत पुढील महत्त्वाच्या मागण्या प्रशासनापुढे मांडण्यात आल्या आहेत:डॉक्टरांची रात्रीच्या वेळेस उपस्थिती सुनिश्चित करणे, जेणेकरून आपत्कालीन स्थितीत रुग्णांना तत्काळ उपचार मिळू शकतील.१०८ ॲम्बुलन्स सेवा सुरळीत आणि वेळेवर कार्यरत ठेवणे, जेणेकरून अपघातग्रस्त रुग्णांना वेळेत




रुग्णालयात आणता येईल.रुग्णालयातील लँडलाईन (टेलिफोन) सेवा तत्काळ सुरू करणे, नागरिकांना थेट संपर्कासाठी.सफाई कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांची तातडीने भरती करणे, जेणेकरून रुग्णालय परिसर स्वच्छ व आरोग्यदायी राहील.या सर्व मागण्यांसाठी पत्रकार परिषदेतून प्रशासनाकडे लेखी निवेदन देण्यात येणार आहे. पाटोदा शहरातील नागरिकांना आरोग्य सुविधा अधिक सक्षम व उपलब्ध व्हाव्यात, हा या मागण्यांमागील मुख्य उद्देश असल्याचे मराठी पत्रकार परिषदेकडून सांगण्यात आले.या वेळी मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष अजय जोशी, ज्येष्ठ पत्रकार जिल्हा उपाध्यक्ष कदर मकरानी,हमीद खान पठाण,सय्यद साजिद,पवनकुमार भोकरे, शेख जावेद, दिगंबर नाईकनवरे,सतीश गर्जे, हरिदास शेलार तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी आणि तहसील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.परिषदेच्या या पुढाकाराचे शहरातील नागरिकांकडून स्वागत होत असून, प्रशासनाने यावर तात्काळ कार्यवाही करावी, अशी एकमुखी मागणी होत आहे.

## पान एक वरून

**खडकतमध्ये तणाव!!**

वरून हा वाद सुरू झाला. हा वाद अति टोकाला पोहोचल्यानंतर दोन गटामध्ये मोठया प्रमाणात दगडफेक देखील झाली. दोन्ही बाजूने झालेल्या दगडफेकीत गावातील नागरिक जखमी झाले आहेत. त्यामुळे आष्टीत दोन गटात मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला होता. अखेर पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस शिपाई सद्दाम शेख यांच्या फिर्यादीवरून दोन्ही गटांवर भारतीय दंड संहिता कलम १०९ (१), ११०, ११५ (२), ११८ (१), १२५, २२३, ३२४ (२), १८९ (२), १८९ (३), १९१ (२), १९१(३), १९०, १९२, ३५२, ३५१ (२), ३५१ (३) आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आतापर्यंत ४५ आरोपींची नावे निष्पन्न झाली असून त्यातील २३ जणांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून त्यांच्या अटकेसाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.या घटनेनंतर पोलीस अधीक्षक नवनीत कवित यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे, विक्रांत हिंगे, भार्गव सपकाळ, मंगेश साळवे, महादेव ढाकणे यांच्यासह अधिकारी व अंमलदारांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले असून सध्या परिसरात शांतता आहे.

**तिन्ही सैन्य दल हायअलर्टवर!**

तसेच मोस्ट फॉरवर्ड पोस्टवर टी-९० भीष्म टँक, स्पाईक यासारख्या ॲटी टँक गायडेड मिसाईल सिस्टिम्स, पिनाका मिसाईल सिस्टिम्स तैनात करण्यात आल्या आहेत. हेरोन तसेच स्वदेशी ड्रोनच्या माध्यमातून एलओसीच्या पलीकडे नेमके काय चालले आहे, यावर २४ तास लक्ष ठेवण्यात येत आहे. यासोबतच भारताची वायुसेनादेखील दक्ष झाली आहे. भारताचे सुखोई-३० एमकेआय, मिराज-२००० आणि राफेल विमान पंजाब, जम्मू आणि श्रीनगर एअरबेसवर तयार आहेत.याशिवाय नौदलानेही पश्चिमी समुद्रावर आपली गस्त वाढवली आहे. अरबी समुद्रात मिसाईल विध्वसंक, फ्रिगेट्स यासारखी प्रमुख जहाजे गस्तीवर आहेत. आयएनएस विक्रांतला कारवार बेसवर तैनात करण्यात आले आहे. नौदलाकडे असणारे हेलिकॉप्टर्स, एअरक्राफ्ट्सही तयार ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे पाकिस्तानविरोधात काही तरी मोठे घडणार, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

**मराठवाड्यातील युवा**

युवा सेना एक मोठी संघटना म्हणून ठामपणे राज्यात उभी असेल हे आमचं ध्येय आहे. हे ध्येय पूर्ण करण्यासाठी आम्ही मराठवाड्यासह महाराष्ट्रभर युवा सेनेच्या माध्यमातून दौरे करत आहोत. मराठवाड्यात युवा सेनेच्या माध्यमातून युवकांचे प्रश्न व त्यांच्या समस्या सोडविण्याचा पूर्ण प्रयत्न मी प्रमाणिकपणे करत आहे. मराठवाड्यासह राज्यात युवा सेना, मजबूत व बळकट करण्यासाठी युवकांचे प्रश्न आम्ही आमच्या माध्यमातून सोडवन्यात प्रयत्नाशील आहोत. लवकरच युवासेना ही राज्यातील लाखो युवकांचा आवाज बनून मराठवाड्यासह राज्यातील एक नंबरची संघटना करण्याचे ध्येय समोर आम्ही ठेवले आहे. राज्यातील युवकांचे शिक्षण, रोजगार, क्रीडा , सामाजिक असे सगळेच मुद्दे उचलू. सामान्य घरातील युवकांना ही राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना योग्य ती जबाबदारी देण्याचा ही प्रयत्न केला जात आहे. येणाऱ्या काळात युवा सेना ही राज्यातील सर्वात मोठी युवा संघटना बनविण्याचा माझा पूर्ण प्रयत्न राहील.आणि महाराष्ट्रात युवा सेना ही एक नंबर वर असेल. असा विश्वास युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांनी करमाळा या ठिकाणी पत्रकारांनी युवासेने बाबतीत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देऊ आपले पक्ष संघटने बाबत मत व्यक्त केले आहे.

**मेधा पाटकर यांना**

त्यांच्याविरुद्ध लावण्यात आलेल्या शिक्षेच्या अटी स्वीकारण्याचेही टाळत आहेत. या न्यायालयाने ८ एप्रिल रोजी दिलेल्या शिक्षेच्या निलंबनाचा कोणताही आदेश नाही असेही न्यायालयाने नमूद केले. २००० साली दाखल झाला गुन्हामेधा पाटकर आणि व्ही.के. सक्सेना हे दोघेही २००० सालापासून कायदेशीर लढाई लढत आहेत. सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर त्यांच्या नर्मदा बचाओ आंदोलनासाठी ओळखल्या जातात. २००० साली त्यांच्याविरोधात दिल्लीत मानहानीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. याच खटल्यासंदर्भात काही दिवसांपूर्वी दिल्ली न्यायालयात सुनावणी देखील झाली होती. तेव्हा न्यायालयाने मेधा पाटकर यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते. आज त्यानुसार कारवाई करत दिल्ली पोलिसांनी त्यांना अटक केली.

**२३ राज्यांना अतिवृष्टीचा**

आहे. दक्षिण भारताना देखील पाऊस झोडपून काढणार आहे. दक्षिण भारतामध्ये तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आध्र प्रदेश आणि पाँडेचेरी या राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.दुसरीकडे बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये देखील जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, सिक्कीममध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्रात मात्र उष्णतेचा तडाखा बसणार आहे, आणखी काही दिवस महाराष्ट्रात उष्णतेची लाट पाहायला मिळणार आहे. राज्यात ब्रम्हपुरीमध्ये सर्वाधिक ४५.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याला हाय अलर्ट देण्यात आला आहे.

**ठाण मांडलेल्या पोलिसांच्या**

प्रयत्न कसोशीने करण्यात आला आहे. येत्या काही दिवसात जिल्ह्यात काही प्रमाणात सुरु असलेला जुगार, अवैध कला केंद्र बंद करण्यात येतील. या संदर्भात सर्व प्रभारी ठाणेदारांना कडक सूचना देण्यात आलेल्या आहेत. बसलेल्या पोलिसांच्या मे मध्ये सर्व तपासणीअंती बदल्या करण्यात येणार आहेत.

**महात्मा बसवण्णा लिंगायत**

प्रेरणा मिळाली आहे. अनुभव मंटपातील वचनांमध्ये केवळ धार्मिक किंवा तात्त्विक ज्ञानच नाही तर सामाजिक सुधारणा आणि मानवी मूल्यांचाही महत्त्वपूर्ण संदेश आहे. जर या साहित्याचा योग्य प्रकारे अनुवाद करून जगभरात प्रसार केला गेला असता तर ते निश्चितच अखिल मानवजातीसाठी एक अनमोल ठेवा ठरू शकला असता आणि जगभरातील लोकांना अधिक उन्नत जीवनाची दिशा दाखवू शकला असता.शहरातील लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवनात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाश बुरांडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून परळी वीज निर्मिती केंद्राचे सहायक कल्याण अधिकारी शरद राठोड, सामाजिक कार्यकर्ते मनोज संकाये, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख ए. तु. कराड, उप कार्यकारी अभियंता श्रीकांत इंगळे, सामाजिक कार्यकर्ते ॲड. रमेश अप्पा साखरे, माजी नगरसेवक महादेव इटके, पत्रकार धनंजय अरबुने, पत्रकार धनंजय आढाव, विकास हलगे,पोलीस कर्मचारी विष्णू फड, पोलीस कर्मचारी गोविंद कांदे आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना शरद राठोड म्हणाले की, फुले-आंबेडकरी अभ्यास समूहाच्या कार्यक्रमात अभ्यासपूर्ण मांडणी केली जाते. बसवण्णांचा जन्म २५ एप्रिल ११०५ आणि महालिंगैक्य कार्तिक पौर्णिमा ११६७ असल्यामुळे तारखेनुसार जयंती साजरी करण्यात आली. मनोज संकाये, ड . रमेश साखरे आणि ए. तु. कराड यांनीही आपले विचार व्यक्त केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार बालाजी ढगे, पत्रकार महादेव शिंदे, आकाश देवरे, नितीन ढाकणे, मयूर अरबुने आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक भगवान साकसमुद्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रानबा गायकवाड यांनी केले.

## देशाला समस्यामुक्त करण्याची क्षमता आंबेडकरवाद्यांमध्ये आहे - शाम तांगडे

अंबाजोगाई/प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अथक परिश्रमातून व संघर्षातून देशाला मानवी मूल्ये प्रदान करणारे संविधान दिले. तसेच धम्मक्रांतीच्या माध्यमातून संविधान मूल्यांचे रक्षण करणाचा लाखो अनुयायांचा जनाधार राष्ट्राला दिला. देशाच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असा जनाधार हा आंबेडकरवादी जनाधार आहे. देशाला योग्य दिशानिर्देशन करणारा जनाधार हा आंबेडकरवादी आहे. संविधान आणि धम्म ही या आंबेडकरवादी जनाधाराची बलस्थाने आहेत. आज देशाचे भवितव्य उथळ लोकांच्या हाती आहे. ते देशात समस्या निर्माण करत आहेत. भेदभाव निर्माण करत आहेत. यावर मात करण्याची जबाबदारी ही आंबेडकरवाद्यांची आहे. देशाला समस्यामुक्त करण्याची क्षमता ही आंबेडकरवाद्यांमध्ये आहे. असे विचार ड शाम तांगडे यांनी व्यक्त केले आहेत. परळी येथे आयोजित भीमजयंती महोत्सव कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. आंबेडकरवाद्यांची बलस्थाने : संविधान आणि धम्म या विषयावर त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

याप्रसंगी पुढे बोलतांना ते म्हणाले की डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम गुलाम असलेल्या लोकांसाठी मताधिकाराची मागणी केली. आंदोलनाच्या माध्यमांतून त्यांना मान , सन्मान व प्रतिष्ठेचे धडे देऊन स्वाभिमानी चळवळव उभी केली. महाडला सामाजिक क्रांती करून त्यांनी अस्पृश्यता गाडली. गोलमेज परिषदेत देशाच्या स्वातंत्र्याची मागणी केली. या परिषदेने त्यांचे नेतृत्व जगतमान्य झाले. भेदभावाला खतपाणी घालणारा मनूचा कायदा त्यांनी नष्ट केला. विविधतेला एकासुत्रात गुंफून त्यांनी संविधान निर्माण केले. व्यक्तीला मान, सन्मान व प्रतिष्ठा देणारे नवी मूल्ये त्यांनी देशाला दिली. भारतीयता जोपासणारा नवा राष्ट्रवाद त्यांनी दिला. पण शासनाने संविधानाला आपला कृतीकार्यक्रम केले नाही. शिवाय त्यांनी संविधानाची मूल्ये ही लोकांपर्यंत नेली नाही. संविधान मूल्ये लोकाभिमूख करण्याचे काम आंबडकरवादी चळवळीने केले. बहिष्कृतांना स्थैर्य मिळवून देण्यासाठी व त्यांना राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सक्रिय ठेवण्यासाठी त्यांनी धम्मक्रांती केली. धम्मक्रांतीच्या माध्यमातून त्यांनी लाखो लोकांचा जनाधार हा राष्ट्रसंचलनासाठी देशाला अर्पण केला. हा आंबेडकरवादी जनाधार देशातील सर्व प्रकारच्या समस्यांवर मात करण्यासाठी कार्यरत आहे. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या माध्यमातून हा आंबेडकरवादी जनाधार आता जगाचे केंद्रक झाला आहे. असे ते म्हणाले. डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर रेल्वे स्टेशन मैदान येथे हा व्याख्यान कार्यक्रम संपन्न झाला. सुरुवातीस पाहुण्यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा विलास रोडे यांनी केले. प्रास्ताविक प्रा दासू वाघमारे यांनी केले. तर आभार प्रदर्शन भास्करनाना रोडे यांनी केले. कार्यक्रमास परळी शहरातील विविध नगरातील नागरिकांची उपस्थिती होती.

## पान सहा वरून

**महावितरणकडून अर्थपूर्ण**

गेली नसेल तर मग हा पैसा गेला कुठे, असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. कारण उन्हाळ्याच्या दिवसांत विजेच्या घडणाऱ्या घटना महावितरणच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करीत आहेत. शहरात विजेच्या समस्येने ग्राहकांची झोप उडाली आहे. समस्यांचे निराकरण करण्यासाठीदेण्यात आलेली कामे एजन्सी करतात की नाहीत, या एजन्सीवर वचक कोणाचा आहे, याबाबत विचारणा करण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. शहर अभियंत्याने, अतिरिक्त अभियंत्याकडे आणि अतिरिक्त अभियंत्याने मुख्य अभियंत्याकडे बोट दाखवीत टोलवाटोलवी केली.

**बाबासाहेब उपेक्षितांच्या प्रगतीसाठी**

अनेक कलमांची नोंद करून त्याचे हक्क व अधिकार मिळवून दिले. थोर महापुरुषांचे विचार आत्मसात करून आगामी काळात युवकांनी व्यसनमुक्त समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी महापुरुषांचे विचार घरा-घरात व गावा-गावात पोहचविण्याचे काम करावे. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडीत, किशोर कांडेकर, किसन तांगडे, शाहु डोळस, सुभाष तांगडे, संजय गव्हाणे, भैय्या भालेराव, आप्पा भालेराव, सुनिल कांडेकर, भाऊसाहेब भालेराव, विजय डोंगरे, अशोक आठवले, विनोद आठवले, आंबादास आठवले, युवराज डोंगरे, गिताराम डोंगरे,माऊली डोंगरे,नामदेव वाघमारे विनोद तांगडे, प्रदिप तांगडे, धम्मा तांगडे,बाळासाहेब भालेराव. राजेंद्र भालेरावअभिमान भालेराव, श्रीमंत जाधव, मसू जाधवकचरू डावकर, अमोल जाधव, अमोल डावकर,बबन डावकर यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

**अपहरण करणारा आरोपीला**

येथे आणुन पिडीत मुलीने दिलेल्या जबाबावरुन आरोपीताविरुध्द बलात्कार व पोक्सो कायद्यांतर्गत कलम वाढ करुन आरोपीतांची पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आला असुन पुढील तपास गेवराई पिक पथकाचे सपोनि राजेश गढ़वे हे करत आहेत. सदर कामगिरी मा.पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक, सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई बाळकृष्ण हनपुडे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली तलवाडा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि/सोमनाथ नरके यांचे पथकातील सदर गुन्हयाचे तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील कोळी पोह. हनुमान जावळे, यांनी कामगिरी केली आहे.

**स्पर्धा परिक्षेत मारली**

विचारून पुष्पराज खोत यांची यशोगाथा सर्वांच्या समोर आणली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध शिवव्याख्याते उद्योजक श्री महादेव खराटे सर व कार्यक्रमाचे प्रस्ताविक आयोजक मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड सर यांनी केले. याप्रसंगी प्रा. घोळवे सर, राजेंद्र पवार सर,बबन पाळवदे सर,हरिभाऊ मोरे सर, अमोल पवार सर बन्सी मोराळे सर व मान्यवर मंडळी उपस्थित होते.

**जवळा येथे जलतरण**

करण्यासाठी मदत होते त्याचबरोबर या खड्ड्यामुळे ज्या जमिनीत चिबड लागते त्या जमिनीत सुद्धा चांगल्या पूर्ववत होतात असे अनुभव आहेत त्यामुळे चिबड जमिनीचे चिबड निघण्यासाठी सुद्धा या खड्ड्याचा उपयोग होतो यावेळी शेतकरी आणि कृषी विभागातील कर्मचारी यांच्या श्रमदानातून दगड गोळा करून खड्डा भरण्यात आला. प्रात्यक्षिक पूर्ण झाल्यानंतर तसे पर्यवेक्षक भुजंग लोकरे यांनी आलेल्या सर्व शेतकरी आणि कर्मचाऱ्यांचे आभार मानले. यावेळी कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी चौगुले मॅडम, कृषी पर्यवेक्षक संदीप अडसूळ, कृषी सहाय्यक गायकवाड, एस बी देशमुख, आर ए गायकवाड, दिलीप आवाड, मनोज पालकर, श्रीमती व्ही एस चंदनशिव, आर व्ही जाधव, एन बी गिरी इत्यादी कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**लघु पाटबंधाऱ्यांची चौकशी**

दिला आहे १७ बटे एक मधील लघु पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांनी कॉलीटी कंट्रोल मार्फत चौकशी आठ ते दहा दिवसांच्या आत नाही केली तर चिंचोली माळी येथे अमरण उपोषन श्री संत नामदेव महाराज सभागृहात करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे प्रशासनाला देत आहोत अमरण उपोषन दरम्यान काही झाले तर लघुपाटबंधारे विभागाचे अधिकारी व प्रशासन जबाबदार राहील निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील व युवराज गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

**अखेर बस फेरी होणार**

भ्रमणध्वनी व्दारे दिली आहे,हि फेरी मेढा येथुन सकाळी ०६:०० वाजता निघून ती सातारा,फलटण,बाराम ती, भिगवण,राशीन,कर्जत,जामखेड, बीड,गेवराई,अ ंबड,जालना,नाव्हा,सिंदखेडराजा, सुलतानपूर मार्गे लोणार येथे रात्री ०८:०० वाजता मुक्कामी पोहचेल तर लोणार येथुन सकाळी ०७:०० वाजता सदर फ ेरी मेढा करीता सुटुन ती मेढा येथे रात्री ०९:०० वाजता पोहचेल,प्रवाशांच्या मागणीनुसार व त्यांच्या सेवेसाठी सदर फेरीचा प्रवाशी,पर्यटक आणि विद्यार्थी यांनी लाभ घ्यावा व फेरीच्या उत्पन्नात वाढ करावी असे आवाहन प्रवासी सेवा संघटनेचे अध्यक्ष उस्मान शेख,सचिव,भागवत खरात,आणि उपाध्यक्ष अशोक काटकर यांनी केले आहे!

**रेणुकामाता यात्रा**

काल मंगळवारी रात्री आराधी मंडळाच्या देवीच्या गाण्याचा कार्यक्रम घेण्यात तसेच बुधवारी कुस्तीचा कार्यक्रम घेण्यात आला अशा प्रकारे सातेफळ येथील रेणुका माता यात्रा महोत्सव उत्साहात संपन्न झाला यावेळी गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात यात्रेचा आनंद घेतला आहे अशा प्रकारे यात्रा महोत्सव संपन्न झाला आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी



## पंचायत समिती मुरबाड येथे बैठक संपन्न

**मुरबाड :** ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या उपस्थितीत मुरबाड पंचायत समितीमध्ये महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीमध्ये विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत रोहन घुगे यांनी सांगितले की, प्रशासकीय कामकाजाबाबत कर्मचारी यांनी कार्यवीवरण पत्र, ई-ऑफिस कार्यप्रणाली सुरळीतपणे पार पाडणे अत्यावश्यक आहे आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यावर लक्ष केंद्रित करावे. कार्यालयीन सूचनांचे पूर्ण पालन करणे, योजनांची अंमलबजावणी करणे, तसेच १०० दिवसीय आराखड्यातील सर्व कामे ३ दिवसांत पूर्ण करण्यात यावी. पी. एम. जन. मन व रमाई योजनेची घरकुलांना ७ दिवसांच्या आत मंजुरी देण्यात यावी. स्वच्छ भारत मिशन योजनेचे फोटो ३ दिवसांत अपलोड करण्याच्या सुचना दिल्या. बैठकीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे तसेच मुरबाड पंचायत गट विकास अधिकारी लता गायकवाड, सर्व तालुका विभाग प्रमुख, पंचायत समिती मुरबाड तालुक्यातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घराशेजारी, दुकानाबाहेर, चौकात कचरा टाकणाऱ्यांवर होणार दंडात्मक कारवाई

### महापालिकेच्या त्रीसूत्री कार्यक्रमात आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे महापालिका क्षेत्रात, घराशेजारी, दुकानाबाहेर, चौकात, रस्त्यावर कचरा, डेब्रिज, मोडके फर्निचर टाकून अस्वच्छता केल्याचे ठिकठिकाणी आढळते. ही अस्वच्छता शहराच्या सौंदर्याला बाधा आणणारी तसेच नागरिकांचीही गैरसोय करणारी असते. त्यातून मार्ग काढण्यासाठी कचऱ्याची पर्यायी व्यवस्था, लोकसंवाद आणि दंडात्मक कारवाई असा त्रीसूत्री कार्यक्रम राबवण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी रस्त्यावर, चौकात, रस्त्याच्या कडेला कचरा, गृहसंकुलांच्या बाहेर, बांधकामातील शिल्लक साहित्य, डेब्रिज, मोडके फर्निचर, गाद्या आदी वस्तू टाकलेल्या दिसतात. दैनंदिन कचरा काढला जात असला तरी या ढिगाऱ्यांमुळे अस्वच्छता निर्माण होते. नागरिकांची गैरसोय होते, रहदारीला आडकाठी होते. यासंदर्भात, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही वेळोवेळी अशा ठिकाणांबाबत सूचना दिल्या असून अस्वच्छतेबददल नाराजी व्यक्त केली आहे. नुकतीच आयुक्त कार्यालयात या विषयाबाबत बैठक झाली. त्यास, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त मनीष जोशी, शंकर पाटोळे, दिनेश तायडे, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.





या समस्येच्या पार्श्वभूमीवर, उपाय म्हणून सर्व सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता आणि स्वच्छता निरीक्षक यांनी आपापल्या क्षेत्रात अशी कचरा टाकण्याची ठिकाणे शोधून काढावीत. तेथे कचरा उचलण्याचा पर्याय द्यावा, तसेच कचरा, डेब्रिज न टाकण्याबाबत परिसरातील नागरिक, दुकानदार यांच्याशी संवाद साधावा. त्यानंतरही तेथे कचरा किंवा डेब्रिज आढळ्यास सर्व संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. स्थानिक समुदायांमध्ये स्वच्छतेविषयी सजग असलेल्यांची फळी तयार करावी. त्यांच्या माध्यमातून लोकसंवाद साधल्यास कचरा टाकण्यास प्रतिबंध होईल. त्यातूनही काही बदल झाला नाही, तर संबंधितांवर दंडात्मक कारवाईचा पर्याय राहील, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

पाणी गळती, नादुरुस्त रस्ते, झाडांच्या फांद्या तोडून टाकणे याबाबत सगळ्या अधिकाऱ्यांनी सतर्क राहून त्या गोष्टी संबंधित विभागाच्या निदर्शनास तत्काळ आणून द्यावे. या तक्रारींची ताबडतोब नोंद घेऊन त्यावर कारवाई केली जावी, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

तुटलेले फुटपाथ, गटारांची मोडकी झाकणे, तुटके दुभाजक यांच्या दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी ही अभियंता विभागाची असून त्यांनी ती कामे तत्काळ करावीत, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. तसेच, परिमंडळ उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता यांनी आठवड्यातून दोन दिवस आपापल्या क्षेत्रात सकाळी फेरी मारावी. सकाळी चालणाऱ्या लोकांशी संवाद साधावा. तसेच, साफसफाई, डेब्रिज आदीची पाहणी करून स्वच्छतेचा नियमित आढावा घ्यावा. ही प्रभात मोहीम नियमितपणे सुरू करावी, असे निर्देशही आयुक्त राव यांनी दिले.

### अंतिम फायर 'एनओसी'शिवाय होतोय इमारतीचा वापर

## ठाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीत अनधिकृत बांधकाम



◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

गावदेवी मार्केट (गावदेवी भाजी मंडई ) ही व्यवसायिक इमारत ठाणे महानगरपालिकेकडून २०१४ साली बांधण्यात आली. शहराच्या मध्यवर्ती भागात वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या या इमारतीच्या बेसमेंटला दुचाकी वाहनांची पार्किंग तळमजल्यावर भाजी मंडईसह (भाजीपाला दुकाने) इतर व्यावसायिक गाळे व वरील मजल्यावर ठाणे महानगरपालिकेचे नौपाडा कोपरी प्रभाग समिती कार्यालय, तसेच दुय्यम निबंधक कार्यालय व इतर कार्यालये असल्याने दररोज हजारो लोकांची ये-जा या ठिकाणी असते; परंतु या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र अर्थात ओसीच (ओक्युपेशन सर्टिफिकेट) नाही. ओसी असल्याशिवाय बिल्डर वा मालक कुणालाही इमारतीचा-घराचा ताबा देऊ शकत नाही. असे झाल्यास हा गुन्हा मानला जातो असे असतानाही ठाणे महापालिका स्वतःच्या मालकीच्या ओसी नसलेल्या इमारतीचा व्यावसायिक वापर मागील दहा वर्षांपासून सर्रासपणे करत आहे.

नियमाप्रमाणे ओसी असल्याशिवाय कोणालाही फायर एनओसी देता येत नाही; परंतु या इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर प्राथमिक फायर एनओसी देताना अग्निशमन विभागाकडून अस्तित्वात असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार या इमारतीस स्वतंत्र नियंत्रण कक्ष पुरवणे बंधनकारक असल्याचे तसेच स्थायी अग्निशमन व प्रतिबंधात्मक यंत्रणा कार्यान्वित असले बाबतचा अहवाल वर्षातून दोनदा अग्निशमन विभागास सादर करणे बंधनकारक असल्याचे सांगितले होते; परंतु मागील दहा वर्षांत असा कुठल्याही प्रकारचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही व सद्यस्थितीत या इमारतीची अग्निशमन यंत्रणाच योग्य प्रकारे कार्यान्वित नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

> महापालिकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीची ओसी नाही, मंजूर नकाशा व्यतिरिक्त बांधकाम, फायर ऑडिट नाही त्यामुळे ठाणे महानगरपालिकेचा गैरकारभार चव्हाट्यावर आला आहे.
> आता तरी याला जबाबदार अधिकाऱ्यांवर आयुक्त कारवाई करणार का...?
> **- राहुल पिंगळे**

या इमारतीतील तळ मजल्यावरील गाळे पुनर्वसन स्वरूपात भाजी मंडई साठी दिलेले आहे; परंतु भाजीविक्री न करता मोठ्या प्रमाणात येथील गाळ्यांच्या वापर कपड्यांच्या दुकानांसाठी केला जात आहे. तसेच या इमारतीमध्ये मंजूर नकाशा व्यतिरिक्त आत येण्याचा मार्ग, बाहेर जाण्याचा मार्गातील पूर्वेकडील जिन्यावर उत्तरेकडील रॅम्पवर अनधिकृत बांधकाम केल्याचे शहर विकास विभागाच्या पाहणी अहवालातून निदर्शनात आले असल्याने तसेच तळमजल्यावर मोठ्या प्रमाणात कपड्याची दुकाने असल्याने आग लागण्याची घटना घडल्यास बाहेर पडताना चेंगराचेंगरी होऊन मोठी दुर्घटना अथवा जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या ठिकाणचे अनधिकृत बांधकाम शहर विकास विभागाची पूर्व परवानगी न घेता स्थावर मालमत्ता विभागाने पुनर्वसन स्वरूपात दिले असल्यास एक प्रकारे गाळेधारकांची देखील केलेली फसवणूक आहे. त्यामुळे या पद्धतीने महानगरपालिकाच आत बाहेर येण्याच्या जिन्याच्या मार्गात अनधिकृत बांधकाम करून पुनर्वसन कसे काय करू शकते असा सवाल ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी उपस्थित करत या सर्व प्रकरणाची चौकशी करून जे कोणी दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर कडक कारवाईची मागणी पालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेत केलेली आहे.

## वेचक

### पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसैनिकांची निदर्शने



**कळवा :** जम्मू-काश्मीरमध्ये पहलगाम येथे अतिरेक्यांनी भारतातील व विदेशातील पर्यटकावर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ कळवा नाका येथे शिवसेना शिंदे गटाच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले व हल्ल्यात इतर राज्यातील तसेच महाराष्ट्रातील डोंबिवली व पनवेल येथील पर्यटकांचा मृत्यू झाल्याने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शिवसैनिकांतर्फे अतिरेक्यांनी केलेल्या कृत्याचा निषेध करण्यात आला. शिवसेना शहरप्रमुख नरेंद्र शिंदे यांच्या आयोजनाखाली येथील माजी नगरसेवक उमेश पाटील, राजेंद्र साप्ते, राजेश विराळे, गणेश कांबळे, रवी पाटील, राकेश पाटील, नथु पाटील, सुनील गौरी, विभाग प्रमुख विजय शिंदे, अरविंद सैतावडेकर, रवींद्र पाटील यांच्यासह महिला आघाडी, मालती वारंग, रचना पाटील अर्चना पाटील, चंद्रकांत साळवी, शिवसैनिक व महिला शिवसैनिक उपस्थित होते.

### केडीएमसीकडून स्वच्छता अभियान



**कल्याण :** शासकीय मार्गदर्शक सूचनानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने वसुंधरा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. दुर्गाडी किल्ल्याजवळील गणेश घाट परिसरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती घडविणे आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणे, हा मुख्य उद्देश होता. या उपक्रमात महापालिका आयुक्त अभिनव गोयल, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव तसेच महापालिका सचिव किशोर शेळके, महानगरपालिकेचे विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या मोहिमेदरम्यान खाडी किनाऱ्यावर साचलेला प्लास्टिक कचरा, पिशव्या, इतर घाणीची साफसफाई करण्याचे अभियान राबवण्यात आले. आपला परिसर स्वच्छ ठेवणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि निसर्गाशी सुसंवाद राखणे, हीच वसुंधरा दिनाच्या साजरीकरणाची खरी दिशा आहे. महानगरपालिका अशा उपक्रमांद्वारे सातत्याने नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करत राहील असे आयुक्त अभिनव गोयल यांनी कर्यक्रमस्थळी सांगितले.

### पहलगाम अतिरेकी हल्ल्यातील मृत रेल्वे कर्मचाऱ्याच्या पत्नीला रेल्वेत नोकरी द्या

**कल्याण :** कश्मीरमध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्यात डोंबिवलीतील तिघाजणांचा मृत्यू झाला असून त्यापैकी अतुल मोने हे मध्य रेल्वेमध्ये



कामाला होते. या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने मोने यांच्या पत्नीला नोकरी देण्याची मागणी भाजपाचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. या संदर्भात पवार यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांची भेट घेत आपल्या मागणीचे निवेदन सादर केले. मोने यांच्या निधनाने त्यांच्या परिवारावर मोठी शोककळा पसरली असून त्यांच्या घरचा आधारवडच हरपला आहे. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे प्रशासनाने आपली सामाजिक बांधिलकी जपून अतुल मोने यांच्या पत्नीला नोकरीत सामाविष्ट करून घ्यावे आणि त्यांच्या परिवाराला भरघोस आर्थिक मदत करण्याची मागणी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

### शहापूरमध्ये हल्ल्याचा धिक्कार

**शहापूर :** जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी मंगळवारी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याचा शहापूर तालुक्यात विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि नागरिकांनी रस्त्यावर उतरुन निषेध नोंदवला. यावेळी या हल्ल्यात मृत्यू झालेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शहापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ एकत्र येत या घटनेचा निषेध करण्यात आला.

## पहलगामच्या भ्याड हल्ल्याचा डोंबिवलीत निषेध; बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

काश्मीरच्या पहलगाममध्ये घडलेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरून गेला, पण डोंबिवलीसाठी हा आघात अधिक खोल होता. या हल्ल्यात शहरातील तीन सुपुत्र-अतुल मोने, हेमंत जोशी आणि संजय लेले यांचे बळी गेले. त्यांच्या जाण्याने डोंबिवलीकर दुःखाच्या छायेत संपूर्ण शहर शोकमग्न झाले. बुधवारी रात्री, शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी एकाच स्वरात फक्त हुंदके होते, आणि प्रत्येक डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहत होता. भागशाळा मैदानात ठेवलेल्या त्यांच्या पार्थिवांना अंतिम दर्शनासाठी आलेल्या नागरिकांच्या गर्दीने हे स्पष्ट केले.

या दुःखद घटनेनंतर, भाजपा नेते राहुल दामले यांनी गुरुवारी डोंबिवली बंदचे आवाहन केले आणि नागरिकांनी केवळ प्रतिसाद दिला नाही, तर तो एक आत्मिक भाव होता. गुरुवारी सकाळपासूनच शहरात बंदला काहीसा संमिश्र प्रतिसाद मिळाला होता. काही दुकान बंद तर काही



सुरू होती. मात्र संमिश्र प्रतिसादात डोंबिवलीकर शोक व्यक्त करत होते. डोंबिवली पूर्व आणि पश्चिम भागांतील अनेक व्यापाऱ्यांनी स्वतःहून आपल्या दुकानांचे शटर खाली करत हा बंद पाळला. शाळांनी विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर केली. नागरिकांनी रस्त्यावर उतरून आपल्या भावना व्यक्त केल्या. कोणत्याही राजकीय बंधनाशिवाय, प्रत्येकाने हा बंद आपल्या अंतःकरणातून स्वीकारला. शहरात ठिकठिकाणी भाजपाकडून उग्र निदर्शने करण्यात आली. "पाकिस्तान मुर्दाबाद"च्या घोषणा घुमत होत्या. निष्पाप नागरिकांचा बळी घेणाऱ्या या कृत्याविरोधात संताप ओसंडून वाहत होता. पोलीस प्रशासनानेही परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊन महत्त्वाच्या चौकांवर बंदोबस्त तैनात केला होता.

या हल्ल्यात देशभरात एकूण २७ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. ही घटना केवळ आकड्यांमध्ये मोजण्यासारखी नाही. प्रत्येक मृत्यू मागे एक कुटुंब आहे, एक स्वप्न आहे, एक भविष्य आहे, जे एका क्षणात उद्ध्वस्त झाले. डोंबिवलीच्या या सामूहिक श्रद्धांजलीने एक संदेश दिला आहे, की अतिरेकी हल्ले आमचं मनोबल कमी करू शकत नाहीत. आमचे दुःखच आमची ताकद बनेल. देशासाठी बलिदान देणाऱ्या प्रत्येक वीराला डोंबिवलीकडून नतमस्तक अभिवादन. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे यांच्यासह हजारो डोंबिवलीकर भागशाळा मैदानात अंतिम दर्शनासाठी जमले होते. भागशाळा मैदानात बुधवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास सर्वात आधी हेमंत जोशी, संजय लेले आणि सर्वात शेवटी अतूल मोने यांचे पार्थिव त्यांच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत आणण्यात आले. त्यावेळी अंत्यदर्शनासाठी उपस्थित असणारे हजारो नागरिक स्तब्ध झाले होते. प्रत्येकाच्या डोळ्यांमध्ये एकीकडे अश्रू होते आणि दुसरीकडे घडलेल्या घटनेबाबत मनामध्ये प्रचंड संताप.

## जमिनीचा मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्यांचा आमरण उपोषणाचा इशारा

◆ **भिवंडी (प्रतिनिधी):**

नागपूर- मुंबई समृद्धी महामार्गाचा इगतपुरी ते भिवंडी या अखेरच्या टप्प्याचे लवकरच उदघाटन होण्याची शक्यता आहे. मात्र शहापुर तालुक्यातील अंदाड येथील विधवा महिला व मजूर काम करणाऱ्या सात शेतकऱ्यांच्या जमिनी सरकारी करून घेतल्या. मात्र तब्बल ८ वर्षे पाठपुरावा करूनही त्यांना मोबदला मिळालेला नाही. सरकारच्या या वेळकाढु धोरणामुळे समृद्धी महामार्गात संपादित केलेल्या जमिनीचा आता मोबदला मिळेल की नाही या मानसिक धक्क्याने गेल्या चार वर्षांत दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला असून आता संतप्त शेतकऱ्यांनी १ मे ला समृद्धी



महामार्गावर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

शहापूर तालुक्यातील अंदाड येथील शेतकरी गुलाब मंगल भोईर, बेबीबाई लहू पवार, सविता काशिनाथ भडांगे, पुनम पंढरीनाथ मोगरे, जयराम नाथा गडगे, यशवंत सिताराम पंडित, निराबाई चिमन भेरे हे मजूर शेतकरी असून विधवा महिला आहेत. समृद्धी महामार्गात या सर्व शेतकऱ्यांचे किमान दहा एकर क्षेत्र संपादित करण्यात आले असून या सात शेतकऱ्यांना आजपर्यंत मोबदला मिळालेला नाही. शेतकऱ्यांच्या नावावर असणाऱ्या जमिनी सरकारी करून घेतल्या मात्र मोबदला लटकावला.

२०१७ ते २०२५पर्यंत शासन दरबारी खेटा मारूनही मोबदला मिळाला नसल्याने या शेतकऱ्यांमध्ये संतापाची तीव्र भावना पसरली आहे. जमीन संपादित केली आठ वर्षांनंतरही मोबदला मिळाला नाही. आता मोबदला मिळेल की नाही या मानसिक धक्क्याने अंदाड येथील यशवंत सीताराम पंडित व यशोदा शिवराम पंडित या दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## ठाण्यात आज पाणीबाणी

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रात अत्यंत महत्त्वाचे देखभाल आणि दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे कटाई नाका ते ठाणे या दरम्यान गुरुवार रात्री १२ वाजल्यापासून ते शुक्रवार १२ वाजेपर्यंत एकूण २४ तासांसाठी पाणीपुरवठा बंद राहणार आहे. महापालिका क्षेत्रात दिवा, मुंब्रा, कळवा, वागळे प्रभाग समितीमधील रुपादेवी पाडा, किसननगर क्र. २, नेहरूनगर तसेच माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीअंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणीपुरवठा २४ तासांसाठी पूर्णपणे बंद राहील. तसेच पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील एक ते दोन दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची नागरिकांनी नोंद घ्यावी. या कालावधीत पाणी काटकसरीने वापरून सहकार्य करावे, असे आवाहन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## 'त्या' दिवशी सकाळीच श्रीनगरला रवाना झाल्याने 'ते' २१ पर्यटक वाचले

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

पहलगाम येथे दहशदवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात देशभरातील अनेक पर्यटक, तर डोंबिवलीतील ३ पर्यटक मारले गेले. मात्र मंगळवारी सकाळीच श्रीनगरला गेल्याने डोंबिवलीतील इतर २१ पर्यटक वाचले असल्याचे सुनील वागळे यांनी सांगितले.

दरम्यान, या पर्यटकांशी बोलताना त्यांनी सांगितले, मंगळवारी सकाळी साडेआठच्या सुमारास पहलगाम येथून श्रीनगरच्या दिशेने रवाना झालो. याचदरम्यान, पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला. मात्र, या हल्ल्यात किती जणांचा मृत्यू झाला हे माहित नव्हते. रात्री आम्हाला पहलगाम येथील हल्ल्यात २७ पर्यटकांचा मृत्यू झाल्याचे डोंबिवलीतील टूर ऑर्गनायझर सुनील वागळे यांनी सांगितले. डोंबिवलीतील २१ जणांसोबत वागळे काश्मीरला गेले आहेत. दहशतवादी हल्ल्यानंतर दुसऱ्या दिवसाची परिस्थिती कशी असेल याबद्दल आम्हाला काहीच कल्पना नव्हती. बुधवारी सकाळी जेव्हा फिरायला बाहेर पडलो, तेव्हा येथील सर्व दुकाने बंद असल्याचे निदर्शनास आले. गुलमर्ग फिरायला गेलो असता त्याठिकाणी साधारण २ हजारच्या आसपास लोक होते. मात्र, या ठिकाणी



नेहमीपेक्षा २० टक्केच लोक दिसून आल्याचे वागळे यांनी सांगितले. त्याचबरोबर, हल्ल्याच्या घटनेनंतर या परिसरात जागोजागी भारतीय सैनिक मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आले होते. बुधवारी आम्ही सर्वजण गुलमर्ग येथे फिरायला गेलो होतो. पहलगाम येथे स्थानिकांनी एक दिवसाचा बंद पुकारला होता. त्यामुळे, पर्यटकांना तेथे जाण्याला बंदी करण्यात आल्याचे कल्याण येथून काश्मीर येथे फिरायला गेलेल्या विना मुंगसे यांनी सांगितले. मुंगसे यांच्यासह सात जण काश्मीर फिरायला गेले आहेत. सहा दिवसाच्या काश्मीर सहलीसाठी मुंगसे गेल्या आहेत. काश्मीर येथे हे सर्व तीन दिवस अगोदर पोहोचले आहेत. बुधवारी रात्री श्रीनगर येथे या सर्वांनी मुक्काम केला. त्याठिकाणी सुरक्षा व्यवस्था मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आली होती. तेथील सुरक्षा व्यवस्था चोख असल्याने हे सर्वजण पहलगामला जाऊन आपली सहल पूर्ण करून येणार असल्याची माहिती टूर ऑर्गनायझर दीपक चौधरी यांनी दिली.

## सैन्यात अधिकारी होण्यासाठी टॅलेन्ट सर्च परीक्षा

**कल्याण :** शिवनिकेतन ट्रस्ट संचालित भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खडवली, कल्याण शाळेच्या माध्यमातून, मुंबई व ठाणे जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांची सैन्य दलात अधिकारी होण्याची टक्केवारी वाढावी, या हेतूने रविवार २७ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत इयत्ता ४ थी ते १२ वी च्या मुले व मुली यांच्यासाठी "मोफत टॅलेन्ट सर्च परीक्षेचे" आयोजन, भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खडवली पूर्व, कल्याण येथे करण्यात आले आहे.

सैनिक शाळा परीक्षा-इ. ५ वीतील विद्यार्थी, राष्ट्रीय सैनिक स्कूल-इ.६वी तील विद्यार्थी, राष्ट्रीय इंडियन मिलिट्री कॉलेज, इ.७ वीतील विद्यार्थी, एस.पी. आय छत्रपती संभाजीनगर-इ.१०वीतील विद्यार्थी, एन.डी.ए.-इ.५वीतील विद्यार्थी-इ.११वी व १२वी (Sci.) तील विद्यार्थी हे या टॅलेन्ट सर्च परीक्षेचे स्वरूप असून गणित, इंटेलिजन्स व सामान्यज्ञान हा अभ्यासक्रम आहे. या परीक्षेचा फायदा शालेय विद्यार्थ्यांना प्रज्ञाशोध, स्कॉलरशिप, ऑलिम्पियाड, एन.एम.एम.एस. तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जेईई, नीट, एमपीएससी, युपीएससी अशा सर्व स्पर्धा परीक्षांच्या पूर्व तयारीसाठी होणार आहे.

### अतिरेक्यांच्या डोक्यावर गो प्रो कॅमेरा होता; डोंबिवलीच्या हर्षचे २ मोठे गौप्यस्फोट

# दहशतवाद्यांच्या अंगावर लष्कराचे कपडे नव्हते

◆ **डोंबिवली (प्रतिनिधी):**

डोंबिवलीतील तीन मावस भावांचा मृतांमध्ये समावेश आहे. तिघेही भाऊ पर्यटनासाठी पहलगामला गेले असताना त्यांच्यावर क्रूर दहशतवाद्यांनी गोळ्या झाडल्या.

मोने, लेले आणि जोशी कुटुंबीयांनी पत्रकार परिषद घेऊन पहलगाममधील संपूर्ण घटनाक्रम सांगितला. झालेला प्रकार अतिशय निर्दयी असून आमचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे. सरकारने आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी मोने. लेले आणि जोशी



कुटुंबीयांनी सांगितले.

आतापर्यंत आलेले दहशतवादी पोलीस वेशात होते, असे सांगितले गेले; परंतु हर्ष लेले यांनी हा दावा फेटाळून लावत दहशतवाद्यांच्या अंगावर लष्कराचे कपडे नव्हते, असे सांगितले. गोळीबार करणाऱ्यांच्या अंगावर ब्राऊन (तपकिरी) रंगाचे कपडे होते, असे सांगितले. तसेच अतिरेक्यांच्या डोक्यावर गो प्रो कॅमेरा लावलेला होता, असे सांगून अतिरेकी सगळ्या हल्ल्याचे शूटिंग करीत होते, असा दावाही प्रत्यक्षदर्शी लेले यांनी केला.

जम्म काश्मीरमध्ये गेल्यावर आम्ही खूप खूश होतो. पहलगाममध्ये आम्ही एका स्टॉलवर खाद्य पदार्थांची चव घेण्यासाठी थांबतो. अचानक आम्हाला गोळीबाराचा आवाज आला. आवाज ऐकताच आम्ही जमिनीवर झोपलो. अतिरेक्यांनी आमच्याजवळ येऊन हिंदू कोण कोण आहेत, असे विचारले. हेमंत जोशी यांनी हात वर केला, त्यावर त्यांना लगेच दहशतवाद्यांनी गोळी मारली. आमच्या समोर पुरुषांना मारले. आम्ही काहीच करू शकलो नाही. सरकारने आम्हाला न्याय द्यावा, असे मृत अतुल मोने यांची पत्नी अनष्का मोने म्हणाल्या.

दहशतवादी गोळी मारताना माझा हात वडिलांच्या डोक्यावर होता. दहशतवाद्यांनी विचारले हिंदू कोण आहेत? वडिलांनी हात वर करताच त्यांच्या डोक्यात गोळी झाडली गेली. माझ्या समोर माझ्या वडिलांना मारले. तिथून आम्ही खाली आलो. आईला पॅरेलिस आहे, तिला आम्ही कसं तरी घेऊन खाली ४ तास चाललो... असे हर्ष लेले यांनी सांगितले.

या सगळ्यात स्थानिकांनी आम्हाला खूप मदत केली. पर्यटन स्थळावर अजिबात सुरक्षा व्यवस्था नव्हती. ५ ते १० मिनिट दहशतवादी आमच्यासमोर होते. त्यांनी आमच्यासमोर अनेकांना मारले. स्त्रियांना आणि छोट्या मुलांना काही करणार नाही, असे ते म्हणाल्याचे हर्ष लेले यांनी माध्यमांना सांगितले.

## दहशतवादी हल्ल्यामुळे काश्मीर सहली रद्द करण्यावर भर

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

काश्मीर येथील निसर्गाचा आनंद घेण्यासाठी भारताबरोबरच जगभरातून पर्यटक येतात. पर्यटनावरच याठिकाणची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. मात्र, मंगळवारी काश्मीर खोऱ्यात पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पर्यटकांना आपले प्राण गमवावे लागले. याचा सर्वात मोठा आर्थिक फटका स्थानिक लोकांना बसणार आहे. दहशतवादी हल्ल्यामुळे कल्याण-डोंबिवली शहरातील पर्यटकांनी काश्मीरला जाण्याची पूर्व नियोजित सहल रद्द करण्यास सुरुवात केली. पर्यटकांनी बुकिंग रद्द केल्याचा परिणाम स्थानिक काश्मिरी लोकांसह तेथील अर्थव्यवस्थेवर होईल अशी भीती कल्याण डोंबिवलीतील टर



ऑर्गनायझरने व्यक्त केली.

दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरला भेट देणाऱ्या पर्यटकांनी आपली पूर्व नियोजित सहल रद्द करण्यासाठी फोन करायला सुरुवात केली. या हल्ल्यामुळे स्थानिक व्यवसाय आणि पर्यटनाचे मोठे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. पर्यटकांच्या फोननंतर तेथील हॉटेल्स, विमानाचे बुकिंग रद्द करायला सुरुवात केल्याची माहिती रणधीर शिंदे यांनी दिली. मोदी सरकारने कलम ३७० रद्द केल्यानंतर काश्मीर खोऱ्यात शांतता प्रस्थापित होत होती. येथील आर्थिक व्यवहार सुधारत असल्याने यंदाच्या वर्षी काश्मीरला जाणाऱ्या पर्यटकांची संख्या सुमारे १५ टक्क्यांनी वाढली होती. मात्र, या हल्ल्यानंतर अनेकांनी काश्मीरऐवजी शिमला आणि मनालीला जाण्यासाठी पसंती दर्शविली असल्याचे टूर ऑर्गनायझर काजल प्रभाळे-घोलप यांनी सांगितले.

# पहलगामचा हिशोब भारत चुकता करणार!

काश्मीरमधील पहलगाम येथील बैसरनमध्ये दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याने भारताच्या सर्वोच्च स्थानी असलेल्या जम्मूपासून ते तळाशी असलेल्या कन्याकुमारीपर्यंत असणाऱ्या प्रत्येक भारतीयांकडून संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याला उत्तर देण्यासाठी भारतीयांच्या हाताच्या मुठी आवळल्या जात आहेत. प्रत्येक भारतीयांच्या मनामध्ये या हल्ल्याप्रती सूडाची भावना जागरुक झाली असून पाकिस्तानी दहशतवादाला ठेचून काढण्याची भाषा उघडपणे बोलली जाऊ लागली आहे. भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेला हल्ला हा धर्म विचारून झाला आहे. दहशतवाद्यांनी पंतप्रधान मोदींचे नाव घेत, त्यांना निरोप द्या, असे सांगत निर्ढावल्याप्रमाणे भारतीय भूमीवर गोळीबार केला आहे. भारताच्या विरोधात भारताच्या भूमीवर येऊन केलेला बेछूट गोळीबार हे भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला दिलेले एक प्रकारचे आव्हान आहे. या पर्यटकांमध्ये मृत्युमुखी पडलेले काही पर्यटक, तर नवीन विवाह झालेले असून भारताच्या स्वर्गभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरमध्ये हनीमूनसाठी गेले होते. आपला मुलगा नवसंसाराची सुरुवात करण्यासाठी काश्मीरला जातो काय आणि दहशतवादी हल्ला करून त्याचे पार्थिव घरी येते काय, जी नववधू घरातून गेली होती, तीच नववधू विधवा बनून घरात परतते काय, हा सर्वच संतापजनक प्रकार आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स हे चारदिवसीय भारत दौऱ्यावर आले होते, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर गेले होते. हे सर्व पूर्वनियोजित होते. अचानक घडलेले नाही. जाणीवपूर्वक घडवून आणले गेले आहे. अर्थात त्यासाठी पूर्वतयारीही जोरदार करण्यात आली होती. हा हल्ला पाकिस्ताननेच घडवून आणला आहे, हे उजेडात आले आहे. सरकारने लवकरात लवकर कारवाई करून या घटनेचा बदला घ्यावा, यासाठी केंद्र सरकारवरही भारतीयांचा दबाव वाढत चालला आहे. भारत सरकारनेदेखील त्यादृष्टीने पाऊले उचलण्यास सुरुवात केली असल्याने पाकिस्तानला नजीकच्या काळात पहलगाम हल्ल्याची जबरी किंमत मोजावी लागणार असल्याचे संकेत विविध घडामोडींतून व बैठकांतून प्राप्त होऊ लागले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तत्काळ पहलगामकडे धाव घेत मृतांच्या व जखमींच्या नातेवाईकांची भेट घेतली. तेथील सुरक्षा यंत्रणांकडून घडल्या प्रकाराची माहिती घेतली.

पंतप्रधान मोदी हे जरी त्यावेळी सौदी अरेबियात असले तरी त्यांनी अमित शहा यांना निर्देश देत तपशीलवार आढावा जाणून घेतला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही लष्कराच्या तीनही दलांची बैठक घेऊन कोणत्याही क्षणी काही घडण्याची शक्यता लक्षात घेऊन तीनही दलांना अलर्ट राहण्याचे निर्देश दिले. पंतप्रधान मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट टाकून भारतात परतले. भारतात परतताना त्यांनी पाकिस्तानी हद्दीचा वापर न करता पाकिस्तानला सूचक इशारा देण्याचे कार्यही कृतीतून केले आहे. पंतप्रधानांनी भारतात येत तातडीची बैठक घेतली. लष्कर आणि संबंधित विभागाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून पंतप्रधानांना यावेळी पूर्ण ब्रिफिंग करण्यात आले. त्यानंतर, अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. पराराष्ट्र खात्याने पत्रकार परिषद घेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयावर माहिती दिली. त्यानुसार, पाकिस्तानविरोधात ५ मोठे निर्णय घेत ५ तगडे धक्के पाकिस्तानला देण्यात आले आहेत. पाकिस्तानच्या दिल्ली दूतावासातील कर्मचाऱ्यांची कपात करण्यास सांगताना पुढील ४८ तासांत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सिंधू जल करारावर स्थगिती देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला असून वाघा बॉर्डर १ मेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. पाकिस्तानी नागरिकांना मंजूर केलेला भारतातील व्हिसा रद्द करण्यात येत आहे, तसेच भारतातील पाकिस्तान दुतावासाच्या आनुषंगाने देखील महत्त्वाचा निर्णय या बैठकीत झाला आहे. दरम्यान, पाकिस्तानची व्यापाराच्या दृष्टीने कोंडी करण्याची रणनीती भारताने आखली असून आजच्या बैठकीतील निर्णयाचा दूरगामी परिणाम भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांवर होणार आहे. पाकिस्तानला धडा शिकविण्याची मागणी भारतवासीयांकडून करण्यात येत आहे. घडलेली घटना भारतासाठी क्लेषदायी असून अमेरिकेचे उपाध्यक्ष भारतात असताना हा हल्ला घडवून भारतात आलबेल नसल्याचे पाकिस्तानने दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. दहशतवाद ठेचून काढला जाईल, दहशतवादाला माफी नसल्याचा इशारा भारताने दिला आहे. भारतानेही पाकिस्तानचा हिशोब कायमचाच चुकता करावा, पुन्हा असे करण्याचे धाडस पाकिस्तानचे होता कामा नये, असा सूर भारतीयांकडून उघडपणे आळविला जात आहे. देशाच्या शत्रूंनी केवळ निष्पाप पर्यटकांवर नव्हे, तर भारताच्या आत्म्यावरच हल्ला करण्याचे धाडस केले आहे. दहशतवाद्यांच्या हाती उरलेली थोडी-फार जमीनसुद्धा आता हिरावून घेण्याची वेळ आली आहे.

आज बिहारच्या भूमीवरून मी संपूर्ण जगाला सांगतो की, भारत प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवेल, त्यांना शोधून काढेल आणि शिक्षा देईल. आपण त्यांचा पृथ्वीच्या टोकापर्यंत पाठलाग करू. आपण त्यांचा शेवटपर्यंत पाठलाग करू. दहशतवादामुळे भारतीयत्वाचे स्पिरीट कधीही कमी होणार नाही. दहशतवादाला माफ केले जाणार नाही. पहलगाम येथे पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवू, त्यांना शोधून काढू आणि त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा त्यांना देऊ, असा वज्रनिर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोलून दाखवला. हल्ला करणारे दहशतवादी आणि याचा कट रचणारे त्यांच्या कल्पनेपलीकडे जाऊन शिक्षा भोगतील. देशाच्या शत्रूंनी भारतीयत्वाच्या स्पिरीटवर हल्ला करण्याचे धाडस केले आहे, असे सांगत भारत लवकरच या घटनेचा हिशोब चुकता करणार असल्याचे संकेत पंतप्रधान मोदी यांनी दिले आहे. २६/११ची घटना असो अथवा पुलवामा हत्याकांड असो, तसेच परवाचा पहलगामचा गोळीबार असो, पाकिस्तान कुरापती काढतच आहे. १९४७ पासून आपण पाकिस्तानाचे उद्योग, कुरापती सहन करत आहोत, पण आता याचा सोक्षमोक्ष लागलाच पाहिजे. पाकिस्तानला धडा शिकविण्याची हीच योग्य वेळ आहे. आता जर कच खाल्ली तर पुन्हा ये रे माझ्या मागल्या... प्रमाणे पाकिस्तान नव्याने पुन्हा दहशतवादी कृत्य करेल. पाकिस्तानच्या कृत्याची भारताने आजवर न भरुन येणारी किंमत मोजली आहे, यातना भोगली आहे. पाकिस्तानचे हे कर्ज सव्याज भारताने फेडणे आवश्यक आहे. भारतातील जनता सरकारसोबत आहे. धडा शिकवण्यासाठी भारताची जनता आता टाहो फोडत आहे. सरकारही लवकरच भूमिका घेईल, त्यादृष्टीने वाटचाल सुरू आहे. जैसी करनी, वैसी भरनी काय असते, ते आता पाकिस्तानला समजलेच पाहिजे...

# मानसिकता समजून घ्यावी लागेल!



काश्मीरमधील पहलगाम येथील क्रूर आणि भ्याड हत्याकांडाने सगळा देश हादरून गेला आहे. ज्यांच्या कुटुंबातले लोक या हल्ल्यात मारले गेले त्यांच्या कुटुंबीयांचा आक्रोश कानात सर्वांच्या घुमतो आहे. क्रूरकर्म्यांचे ते क्रूर कृत्य लोकांच्या डोळ्यांसमोरून अजूनही जात नाही अशी स्थिती आहे.

गेला संपूर्ण आठवडा मूर्शताबाद आणि बंगालमधील मुस्लीम बहुल ठिकाणी तसेच अन्य सर्वत्र वक्फ बोर्डाच्या नवीन कायद्यासंदर्भात झालेली निदर्शने आणि त्या निमित्ताने झालेली आंदोलने, हिंदूंवर झालेले अत्याचार याने हिंदू जनमानस ढवळून निघाला होता. आणि आता ही घटना घडली आहे. समाज क्षुब्ध होत आहे. सरकारकडे कडक कारवाईच्या मागण्या होत आहेत. मोर्चे निघत आहेत. पाकिस्तान विरुद्धच्या घोषणा होत आहेत. नेहमीप्रमाणे राजकारणी गिधाडे या सगळ्या प्रसंगात ही आपली गिधाडी वृत्ती न सोडता सरकारवर आरोप करीत आहेत .

रॉबर्ट वडेरा हिंदुत्वाला दोष देत आहे. उबाठा गटाचे प्रवक्ते आणि तमाम उबाठा गँग भाजपाने धर्मावर आधारित भांडणे लावल्यामुळे ही घटना घडल्याचा आरोप करून आपला नालायकपणा सिद्ध करत आहे. फारुख अब्दुल्ला पाकिस्तानी लोकांनी बांगड्या भरलेल्या नाहीत अशी दर्पोक्ती करण्याची हिंमत करतो आहे आणि भारतातील या सगळ्या घडामोडींकडे बघून पाकिस्तानी राक्षस मनोमन हसतो आहे.

मोहम्मद बिन कासीम, गझनी मोहम्मद, मोहम्मद घोरी, तुघलक, खिलजी, बाबर, औरंगजेब, अफझल खान या आक्रमकांच्या अत्याचारांच्या कहाण्या पुन्हा जागृत होणारे हत्याकांड काल घडले. दहशतवादीवृत्तीला धर्म नसतो हे लिब्रांडू, डावे, तथाकथित सेक्युलरिस्ट यांच्या आवडत्या वाक्याला छाती ठोकून या दहशतवाद्यांनी धर्म विचारत, कलमा वाचायला लावून, सुंता झाली नाही याची खात्री करत निष्पाप लोकांना गोळ्या घातल्या आणि सिद्ध केले आमच्या दहशतवादाचा धर्म कोणता आहे ते. हिंदू समाज ही मानसिकता न समजल्यामुळे पारतंत्र्यात गेला. काही काळ गुलाम बनला. खंडित झाला.

स्वतंत्र झाल्यावर आजही ७५ वर्षांनी आतंकी छायेतून स्वतःला बाहेर काढू शकलेला नाही. राजकारण्यांनी ही मानसिकता जाणूनबुजून मतांच्यासाठी दुर्लक्षित केली. प्रशासकीय व्यवस्थेतील इंग्रज छाप बाबूंनी या मानसिकतेला जिवंत ठेवले. मुल्ला, मौलवी यांनी स्वतंत्र भारतात ही मानसिकता आणखी प्रज्वलित केली. परिणाम काश्मीर ते सर्वत्र भारतमाता रक्तबंबाळ होत चालली आहे. ही मानसिकता समजून घेण्यासाठी काफीर, गझवा ए हिंद, दार उल अरब, दार उल इस्लाम, जिहाद या संकल्पना ज्या मदरशांमधून शिकवल्या जातात आणि त्यातून रॅडिकल इस्लामी आतंकवादी जन्म घेतात या संकल्पना हिंदू समाजाला समजणे गरजेचे आहे. राजकारण्यांनी कुठल्याही पक्षाचे असेना आपल्या भावी पिढ्यांच्यासाठी का होईना याचा जमिनीवरील परिणाम मतांच्या लालसेतून बाहेर येत समजून घेतला पाहिजे . भाषिक अस्मिता, प्रांतिक अहंकार, जातीय दुराभिमान ज्यामुळे हा हिंदू समाज एकसंध होत नाही त्या वृथा गोष्टींचे अंकुर, काटे छाटून टाकले पाहिजेत कारण यापेक्षा वर उल्लेख केलेल्या संकल्पना उद्या तुमच्या घराचे दरवाजे तोडून कधी आत घुसतील ते कळणार पण नाही. पश्चाताप त्यावेळी करण्यापेक्षा हिंदूंनो वेळीच सावरा आणि संघटित व्हा.



**रवींद्र मुळे**

अहिल्या नगर

या रॅडिकल, एकेश्वरवादी विचारांनी संपूर्ण जगाची शांतता बिघडवली आहे. जर्मनी, फ्रान्स, इटली, ब्रिटन, सगळे देश आज होरपळून निघत आहेत. स्वस्त मजूर मिळतात या मोहातून आणि उदार मानसिकता यातून केलेल्या चुकांमुळे त्यांना आज पश्चात्ताप होत आहे. सर्वत्र लोकसंख्येचे असंतुलन घुसखोरी आणि अमर्यादित प्रजनन या दोन मार्गांतून साधले जात आहे. संपूर्ण जग ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहे. ईश्वराने निर्माण केलेल्या मनुष्य या सर्वोच्च सुंदर निर्मितीला नष्ट करत आणि त्यातून निर्माण झालेल्या उज्ज्वल मानवी मूल्यांना पायदळी तुडवत खैबर खिंडीतून आलेल्या या वावटळीला कोणे एके काळी पृथ्वीराज चौहान, राणा सांग, राजा दाहीर, राणा प्रताप, गुरू गोविंद सिंग, राजा रणजीत सिंग, लाचित बड फुकान आणि अर्थात आमच्या छत्रपती शिवाजी महाराजांनी रोखून धरल्यामुळे जगातील मानवता अजूनही टिकून आहे.

छत्रपती शिवरायांनी ही मानसिकता ओळखली होती म्हणून प्रतापराव गुजर यांना त्यांनी दूषणे दिली. त्यांनी ही मानसिकता ओळखली होती म्हणून अफजलखान याचा वध झाला, शाहिस्तेखानाची बोटे गेली. हिंदू साम्राज्याची पुन्हा निर्मिती झाली. आमच्या आजूबाजूला असणाऱ्या आणि काळाच्या ओघात मुस्लीम झालेल्या मंडळीनी मुल्ला मौलवी यांचा पगडा झुगारून दिला नाही. हिंदूंच्या भावभावना समजून घेतल्या नाहीत, तर येणाऱ्या काळात संघर्ष अटळ आहे. ही लढाई एकेश्वर वाद आणि एकम् सत् विप्राः बहुदा वदंती यातील आहे. जर हिंदू समाजाने ही मानसिकता समजून घेतली, तर या लढाईत हिंदू टिकाव धरू शकेल अन्यथा काय होईल हे सांगता येत नाही. कुठल्याही सरकारवर, पक्षावर, संघटनेवर आपले भविष्य सोपवून तात्कालिक मोर्चे काढून, स्मशान वैराग्य आणून हा प्रश्न सुटणार नाही. पाकिस्तान हा एक देश किंवा भूभाग नाही ती वृत्ती आहे. अखंड भारतात ती वृत्ती सर सय्यद अहमदखान याने जिवंत केली. मोहम्मद जीनाने त्यात अजून हवा भरली. परिणाम हिंदूंचा संहार. खिलाफत चळवळ परिणाम हिंदूंचा संहार. बांगला देशात सत्तांतर परिणाम हिंदूंचा संहार.

मंदिरे लक्ष्य करणे, स्त्रियांना बाटवणे आणि हिंदूंना अपमानित करण्याची एकही संधी न सोडणे यातून जे घडत आले त्यातील एक घटना पहलगाममधली आहे. पुढील रमझान येईल तेव्हा काश्मीर आपल्या ताब्यात असेल, असे उद्‌गार काढणारा अतिरेकी संघटनेचा सरदार आणि पाकिस्तान नेमके का निर्माण झाले हे छातीठोकपणे सांगणारा पाकिस्तानचा आर्मी चीफ सगळ्यांचे लक्ष एकच आहे. हिंदू म्हणणारे सर्व संपवणे. मग त्यात बौद्ध, जैन, शीख, आस्तिक, नास्तिक सर्व आले. कुणीही सुटणार नाही. हे लिहिण्यामागे प्रस्तुत लेखकाचे समाजाला भयभीत करण्याचा उद्देश बिलकुल नाही. भारतातील मुस्लिमांनी इंडोनेशियाचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून कट्टरता वाद नाकारला पाहिजे. यातच त्यांचे भले आहेच पण जागतिक शांततेसाठी ते आवश्यक आहे. हिंदू तत्त्व हे मूर्ती पूजा मानणारच.

हिंदू देव देवतांच्या हातात शस्त्र आहेत ते शांती प्रस्थापित करण्यासाठी. उच्च मानवी मूल्ये जिवंत ठेवण्यासाठी. पहलगाम घटना हा दोन्ही बाजूने धोक्याची घंटा आहे. ममता, मुलायम, लालू, राहुल, प्रियांका आणि अलीकडे या कंपूत सामील ठाकरे पिलावळ काळाच्या ओघात अस्तित्वहीन होणार आहेत, पण तोपर्यंत जे नुकसान सहन करावे लागणार आहे ते कालच्या घटनेने अधोरेखित झाले आहे. पहलगाम घटनेतून हिंदू समाज जागृत होऊन त्याला शत्रूबोध कळाला आणि आपली राजकीय शक्ती वाढवण्यासाठी तो अधिक संघटित झाला तरच ज्यांनी आज हे समर्पण केले ते कारणी लागेल, अन्यथा अतिरेकी कारवाईतील आणखी एक घटना म्हणून ही घटना इतिहास जमा होईल. एव्हढाच कालच्या सुन्न, दाहक घटनेचा अन्वयार्थ म्हणावा लागेल.

# श्रवण दोष बाधित बालक : जागरूकता आणि उपाययोजना



आज फेसबुकवर एक खूप वायरल झालेली पोस्ट बघितली. एक रील होती. त्यात एक आई आपल्या अगदी साधारण एक ते दोन वर्षांच्या झोपलेल्या बाळाला कडेवर घेऊन त्याची मान आपल्या खांद्यावर आणि गळ्याशी घेऊन खूप मोठा ढोल जोरजोरात वाजवत होती. बाळ झोपलं होतं असं दिसत होतं. रिलमध्ये एकूणच ढोल आणि इतर वाद्यांचा खूप मोठा आवाज येत होता. आईचे ढोल वाजवताना हलणारे खांदे बाळाची मान, डोकं पण हलवत होते. प्रचंड आवाज होता तरी ते बाळ झोपलेलं होतं अर्थात त्याला किती झोप येत असणार याचा अंदाज येतो. कमेंट्स वाचायची उत्सुकता झाली म्हणून कमेंट्स वाचू लागले, तर त्या आईला कोणी झाशीची राणी संबोधले होते, तर कोणी या आईला आपल्या बाळाची काहीच काळजी नाहीय असं पण आपलं मत मांडले होते. मिश्र विचारांच्या लोकांनी आपापल्या प्रतिक्रिया नोंदविल्या होत्या. नंतर त्या रीलची तक्रार पण झाली. आज आपल्याशी एक वेगळा विषय बोलायचा आहे. बालकांना आज सर्रास आपण मोबाइल वापरताना बघतोय. हेडफोन्स तर कानाचाच एक भाग होऊन गेला आहे. बालकांमध्ये हेडफोन्स वापरण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. कोरोना काळात बालकांना याची जास्त सवय लागली.

ध्वनी प्रदूषण वाढलेलं आहेच. याचा सगळ्यांनाच त्रास तर होतोच आहे आणि श्रवण शक्तीवर होणारा दुष्परिणाम याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. वेगवेगळ्या प्रकारचे श्रवण दोष बालकांमध्ये बघायला मिळत आहेत. सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशनच्या अहवालानुसार १०-१६ वयोगटातील १९ पैकी एक व्यक्ती हेडफोन, रॉक कॉन्सर्ट, स्टिरिओ, नाईट क्लब आणि डिस्कोमधील मोठ्या आवाजातील संगीतामुळे कायमस्वरूपी श्रवणक्षमतेने ग्रस्त आहे.

याबाबत मी पुण्यातील ENT सर्जन डॉ. दुष्यंत खेडीकर यांच्याशी चर्चा केली. डॉ. दुष्यंत खेडीकर हे पुण्यातील नावाजलेले डॉक्टर आहेत. अनेक प्रकारचे श्रवण दोष असणारे बालक यांच्याकडे औषधोपचार आणि सर्जरीसाठी येतात.

भारतात ६३ दशलक्ष कर्णबधिर आहेत. श्रवणशक्ती अक्षम करणे म्हणजे प्रौढांमधील चांगल्या ऐकण्याच्या कानात ४० डेसिबल(dB)पेक्षा जास्त श्रवणशक्ती कमी होणे आणि लहान मुलांच्या चांगल्या ऐकण्याच्या कानात ३०(dB)पेक्षा जास्त श्रवण कमी होणे.

ज्या व्यक्तीला ऐकू येत नाही तसेच सामान्य ऐकू येत नाही - २५ (dB) किंवा दोन्ही कानात त्याहून चांगले ऐकू येत असलेल्या व्यक्तीला - ऐकू येत नाही असे म्हटले जाते.



**डॉ. राणी खेडीकर**

अध्यक्ष बाल कल्याण समिती, पुणे

श्रवण कमी होणे सौम्य, मध्यम, गंभीर किंवा गहन असू शकते. त्याचा एका कानावर किंवा दोन्ही कानांवर परिणाम होऊ शकतो आणि संभाषणात्मक बोलणे किंवा मोठ्याने आवाज ऐकण्यात अडचण येते. दरवर्षी ३ मार्च रोजी जागतिक श्रवण दिवस साजरा केला जातो. जगातील ४६६ दशलक्ष लोक श्रवणशक्ती कमी झाल्यामुळे कमी जगतात. हे जगाच्या लोकसंख्येच्या ५% पेक्षा जास्त आहे. त्यात ४३२ दशलक्ष प्रौढ आणि ३४ दशलक्ष मुलांचा समावेश आहे. ३.६०% बालपणातील श्रवणशक्ती कमी होण्याजोगी कारणांमुळे होते. १.१ अब्ज तरुणांना (१२-३५ वर्षे वयोगटातील) मनोरंजनाच्या सेटिंग्जमध्ये आवाजाच्या संपर्कात आल्याने श्रवणशक्ती कमी होण्याचा धोका आहे, अशी माहिती आपल्याला वाचायला मिळते. डॉक्टरांशी चर्चा केल्यानंतर बालकांमध्ये वाढणारे कर्ण दोष आणि त्याची गंभीरता याची माहिती मिळाली. ही माहिती पालकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. लहान बालकांमध्ये रोग प्रतिकार शक्ती चांगली असते; परंतु अनेक कारणांमुळे कानावर होणारे दुष्परिणाम दीर्घकालीन असतात याची शक्यता नाकारता येत नाही. तरुणांमध्ये sudden hearing loss चे प्रमाण वाढत आहे असे डॉ. खेडीकर यांनी सांगितले. बालकांमध्ये पण प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण होऊ शकते यासाठी पालकांनी बालकांची काळजी घेणे आवश्यक आहे. ध्वनी प्रदूषणापासून बालकांना वाचवणे गरजेचे आहे, असे त्यांचे मत आहे.

एका अत्यंत गरीब कुटुंबातील बालिका जिला कर्णदोष होता आणि त्या कारणाने ती नीट बोलू शकत नव्हती, नीट ऐकू येत नसल्यामुळे शाळेत अभ्यासात तिला अडचणी येत होत्या. या बालिकेला डॉक्टरांनी कर्णयंत्र दिले. कर्णयंत्र वापरल्यानंतर तिने पहिल्यांदा पक्ष्यांचे आवाज एकले आणि त्यावेळी तिच्या चेहऱ्यावरचा आनंद बघण्यासारखा होता. कोकिळा गाते हे तिला त्यादिवशी कळले. या सगळ्या पक्षांकडे इतके मधुर स्वर आहेत हे ती त्या दिवशी पहिल्यांदा अनुभवत होती. कर्णयंत्रामुळे तिची बधिर दुनिया नव्या सूरांनी सजली होती. कर्णदोष लवकर लक्षात आला असता आणि तिला लवकर कर्ण यंत्र मिळालं असते, तर तिने वेळीच प्रगती केली असती. बोलण्यातील अडचणी speech therapy च्या मदतीने लवकर दूर झाल्या असत्या. त्यासाठी पालकांनी जागरूक असणे बालकांच्या आरोग्याच्या समस्येकडे लक्ष देणे आणि सगळ्यात महत्त्वाचे बालकास श्रवण दोषाचा त्रास आहे याचा स्वीकार करणे आणि त्याचे उपचार होऊ शकतात यासाठी डॉक्टरांची मदत घेऊन बालकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे डॉक्टर म्हणाले.

गोंधळ आणि ध्वनी प्रदूषणामुळे अचानक कर्णदोष होणे हे प्रौढांमध्ये प्रचलित आहेच. तथापि, यापूर्वी मुलांमध्ये त्याचा परिणाम फारसा दिसून येत नव्हता. यासंदर्भात अमेरिकेसारख्या विविध देशांमध्ये काही अभ्यास केले गेले आहेत. कॅनडा ऑलिम्पिक, ब्रिटीश, चीन आणि ऑस्ट्रेलिया यापैकी बहुतेकांच्या अभ्यासात असे निदर्शनास आले आहे की, १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये आवाजाच्या सुनावणीचे प्रमाण १२% ते २०% पर्यंत आहे. गोंधळ आणि ध्वनी प्रदूषणांमुळे कर्णदोष याचे मुख्य कारण वैयक्तिक करमणूक उपकरणांचा मोठा वापर हे आहे. पालकांनी आपल्या बालकांचा या ध्वनी प्रदूषणापासून बचाव करायला हवा तसेच बालकांच्या श्रावण क्षमतेबाबत दोष आढळल्यास कर्णदोष तपासणी करून Audiologist आणि ENT तज्ज्ञ यांच्या सल्ल्याने उपचार, सर्जरी तसेच गरज असल्यास कर्णयंत्र बसवून घेण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

डॉक्टर खेडीकर यांनी खूप महत्त्वाचा सल्ला आपल्याला दिला आहे. त्यांचे मत आहे की, बालवाडी, शाळा इथे बालकांच्या कर्ण दोषांचा Baseline Study अभ्यास व्हायला हवा. कधी-कधी कमी प्रमाणात असलेले कर्ण दोष ओळखणे लवकर शक्य होत नाही. अशी तपासणी झाली तर ते कर्ण दोष शोधणे कठीण होणार नाही आणि वेळीच बालकांवर उपचार होईल. डॉक्टर लवकरच अशी तपासणी शाळांमधून होईल याचा प्रयत्न करणार आहेत. कर्ण दोषाबाबत सविस्तर माहिती आणि तपासणी शिबीर ते आयोजित करणार आहेत. त्याचा पालक व बालकांना निश्चितच फायदा होईल. आपण सगळे मिळून बालकांची काळजी घेऊ या आणि याबाबत आणखी माहिती मिळवत राहू, जागरूकता निर्माण करत राहू. जेणेकरून बालकांच्या श्रवण दोष अडचणी आपण सोडवू शकू आणि त्यांचा बधिर झालेला, खोळंबलेला प्रवास आपण सुरळीत करू शकू.

## राशिभविष्य

शुक्रवार, २५ एप्रिल २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती चैत्र कृष्ण द्वादशी शके १९४७ . चंद्र नक्षत्र पूर्वा भाद्रपदा योग ऐंद्र. चंद्र राशी मीन, भारतीय सौर ५ वैशाख शके १९४७. शुक्रवार दिनांक २५ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.१४ मुंबईचा चंद्रोदय ४.४८ उद्याची, मुंबईचा सूर्यास्त ६.५८ मुंबईचा चंद्रास्त ४.३२ राहु काळ ११.०१ ते १२.३६. प्रदोष, शुभदिवस.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : संघर्षातून यश मिळेल.

**वृषभ** : अनुकूल घटना घडतील.

**मिथुन** : कामे मार्गी लावण्यात यशस्वी व्हाल.

**कर्क** : दिवस थोडा सावधगिरीने वागण्याचा आहे.

**सिंह** : महत्त्वाच्या कामात यश मिळेल.

**कन्या** : वाद-विवाद टाळले, तर मनस्ताप होणार नाही.

**तूळ** : मानसिक ताण तणाव राहील.

**वृश्चिक** : नव्या योजना कार्यान्वित होतील.

**धनू** : आर्थिक व्यवहार जरा जपूनच करा.

**मकर** : आपल्या कार्यात मग्न राहणे इष्ट ठरेल.

**कुंभ** : मिळणाऱ्या यशाने हुरळून जाऊ नका.

**मीन** : तरुण-तरुणींचे प्रश्न संपुष्टात येतील.

## दहशतवादी हल्ला विरोधक कधी निषेध करणार

देशात काश्मीरमध्ये काल नुकताच मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. काश्मीरसाठी दहशतवाद नवीन नाही, तरी अलीकडच्या काळात म्हणजेच कलम ३७० हटविल्यानंतर काश्मीरचा बराचसा भागात शांतता प्रस्थापित करण्यात पंतप्रधान मोदी सरकारला चांगलेच यश मिळाले होते. त्यामुळे विरोधकांकडे मुद्दाच शिल्लक राहिला नव्हता. पण आता दुर्दैवाने काश्मीरमधील पहलगाम भागात कट्टरपंथीय मुस्लीम दहशतवाद्यानी बिगर मुस्लीम पर्यटकांना लक्ष्य करत अतिशय क्रुर पद्धतीने हत्याकांड केले आहे. पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जवाबदारी स्वीकारली आहे. सुट्टीचा काळ सुरू असल्यामुळे देशातील आणि परदेशातील देखील पर्यटक मोठ्या संख्येने आलेले होते. जगभरात कट्टर मुस्लीम दहशतवाद्यांच्यामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे. पण याला भारत कायम अपवाद राहिला आहे. भारतात दहशतवादी हल्ला झाल्याचे समजतात पंतप्रधान मोदींनी परदेश दौरा आटोपता घेत लगेचच मायदेशी परत आले. पण विरोधक तर सुट्टीवर परदेशात गेले आहेत. त्यामुळे माध्यमातून त्यांच्या प्रतिक्रिया सुद्धा देशाला हव्या तशा मिळत नाही तेव्हा किमान त्यांनी झालेल्या हल्ल्याचा लागलीच निषेध तरी करायला हवा होता, असे वाटते.

– **संजय साळगांवकर,** कुर्ला, मुंबई

## राजकारण्यांनी वाद बाजूला ठेवावेत

पुढील काळात जागतिक राजकारण, अर्थकारण यात भारताची भूमिका महत्त्वाची असणार आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांनी आपसातील मतभेद, भांडणे राजकीय वादविवाद बाजूला ठेवून सत्ताधारी व विरोधकांनी एकत्रित येऊन प्रयत्न केले, तर देश महासत्ता होऊ शकतो. पण वैयक्तिक महत्वाकांक्षा, एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न, सत्तेसाठी होणारे खालच्या पातळीचे राजकारण या गोष्टी अडसर ठरत असून यावर विचार होईल का?

– **प्र. मु. काळे,** सातपूर कॉलनी, नाशिक

## डोक ठिकाणावर आहे काय?

काँग्रेस पक्षाच्या नेत्या प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी ए. एन. आय. या वृत्त वाहिनीशी बोलताना अत्यंत लाजिरवाणे आणि संतापजनक विधान केले आहे. या हल्ल्यात प्राण गमावलेल्या लोकांना मी श्रद्धांजली वाहतो. देशातील वातावरणामुळे हा हल्ला झाला आहे. मुस्लिमांना मशिदींमध्ये नमाज अदा करण्यापासून रोखले जाणे किंवा मूर्ती शोधण्यासाठी मशिदींचे सर्वेक्षण करणे, यामुळे हा हल्ला झाला आहे. तुम्ही बाबर किंवा औरंगजेबाबद्दल बोललात, त्यामुळे अल्पसंख्याक दुखावले जातात. या मुद्द्यावर राजकारण होते आणि त्यांच्यावर निर्बंध लादले जातात. धर्म आणि राजकारण वेगळे असले पाहिजे. जर हे थांबवले नाही, तर असे दहशतवादी हल्ले होतच राहतील. पहलगाममध्ये नाव-धर्म पाहून गोळ्या झाडल्या. मुस्लिमांना दडपले जाण्याची भावना त्यांच्यात आहे, म्हणूनच त्यांनी हल्ला केला अशी मुक्ताफळे त्यांनी उधळली आहेत. एवढेच कमी होते की काय शिवसेना उद्धव ठाकरे यांचे प्रवक्ते यांचे या हल्लाबद्दलचे विधानसुद्धा अत्यंत बेताल आहे. आज रॉबर्ट वाड्रा यांनी या आतंकवादी हल्ल्याचे समर्थन केले आहे. उद्या शिवसेना उद्धव गटाने सुद्धा आतंकवादी लोकांचे समर्थन केले, तर आश्चर्य वाटणार नाही. कारण आजच्या राजकारणात काँग्रेस आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष हे एकाच भूमिकेत आहेत.

– **अविनाश देशपांडे,** पुणे




## पाकिस्तानची कोंडी करण्याचा योग्य निर्णय

धुमसत्या काश्मीरची वाटचाल परत एकदा नंदनवनाच्या दिशेने सुरू झाल्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढला असतानाच पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत धर्मांध मुस्लीम अतिरेक्यांनी हिंदू पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यामुळे संपूर्ण भारतावर शोककळा पसरली आहे. काश्मीरमध्ये जनजीवन सुरळीत होणे आणि पर्यटन वाढणे हेच मुळी पाक दहशतवाद्यांच्या पचनी पडलेले नसावे आणि त्यातूनच हा हल्ला झाला. निशस्त्र पर्यटकांवर एके ४७ चालवताना धर्माची विचारणा करणे यातून त्यांचा नापाक इरादा स्पष्ट झाला आणि अंदाधुंद गोळीबारातून त्यांनी क्रौर्याची परिसीमा गाठली. त्यांचा शोध घेऊन त्यांना थेट यमसदनी धाडणे हीच दुर्दैवी मृत पर्यटकांना वाहिलेली श्रद्धांजली ठरेल. पंतप्रधान मोदी यांनी परदेश दौरा थांबवून माघारी फिरून युद्धपातळीवर महत्त्वाचे निर्णय घेऊन पाकिस्तानची सर्व स्तरावर नाकेबंदी करण्याची जी भूमिका घेतली आहे ती योग्यच आहे. अशावेळी विरोधी पक्षानेही या घटनेचे राजकारण न करता केंद्र सरकारसोबत राहणे गरजेचे आहे. संपूर्ण देश या कठीण परिस्थितीत एकत्र असल्याचा संदेश जागतिक पातळीवर पोहोचायला हवा.

– **दीपक काशिराम गुंडये,** वरळी.

## सामान्य पर्यटकांची सुरक्षा वाऱ्यावर

पहलगाममध्ये हजारो पर्यटकांच्या सुरक्षेसाठी एकही सुरक्षा रक्षक नसल्याने तेथे दहशतवादी हल्ला झाला,असे का? दहशतवादी हल्ल्यानंतर देशातील मंत्री तेथे भेट देण्यास येतात तेव्हा त्यांच्या सुरक्षेसाठी मजबूत सुरक्षा तैनात केलेली आहे. सशस्त्र पोलीस, मागेपुढे गाड्यांचा ताफा व बॉम्बस्कॉड असा लवाजमा सुरक्षेसाठी नेमला आहे. सुरक्षा व्यवस्था पुरवण्यात एवढी मोठी तफावत का? केंद्रीय मंत्र्यांनाच फक्त जगण्याचा हक्क आहे का? दहशतवादी हल्ल्यात आतापर्यंत सैनिक व सामान्य जनता बळी पडली आहे. जेव्हा अशा हल्ल्यात लोकप्रतिधिनी मारले जातील तेव्हाच सामान्यांची सुरक्षा कडक करणार का? जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटक सुरक्षा यंत्रणांच्या चोख व्यवस्थेवर विश्वास टाकून पर्यटनासाठी येतात. ते दहशतवादी हल्ल्यात मारले जातात, याला कोण जबाबदार? केंद्र सरकार, सुरक्षा यंत्रणा, लष्कर, गुप्तचर, स्थानिक की स्वतः पर्यटक? हिंदू राष्ट्रात धर्माची विचारणा करून हिंदूंना खुलेआम मारले गेले ही हिंदूंची नामुष्की आहे. हिंदू राष्ट्रात हिंदूच सुरक्षित नाहीत. सामान्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याने ते मारले जात आहेत.

– **विवेक तवटे,** कळवा, ठाणे

# प्रतिज्ञापत्रातील साक्षीदार



क्राइम
ॲड. रिया करंजकर

कायदेशीर कामकाज करताना प्रत्येक वेळी स्टॅम्प पेपरची गरज भासते. हे स्टॅम्प पेपर प्रतिज्ञापत्र, घराचे करार करण्यासाठी, मालमत्तेचा करार करण्यासाठी, मृत्युपत्र बनवण्यासाठी अनेक कारणासाठी या स्टॅम्प पेपरची गरज भासते आणि ज्या कारणासाठी तो लागतो ते कारण बनवल्यानंतर म्हणजेच प्रतिज्ञापत्र बनवल्यानंतर आपल्याला रजिस्टर नोटरी केली जाते. ज्यावेळी या सर्व कायदेशीर गोष्टी केल्या जातात. त्यावेळी जी लोक बनवतात त्यांच्या सह्या त्याचप्रमाणे साक्षीदारांच्या या सह्या केल्या जातात. तेव्हाच तो पेपर कायदेशीर म्हणून ओळखला जातो.

जगन्नाथ हा सरकारी कर्मचारी होता आणि त्याची अनेक लोकांशी ओळख होती. असाच एक जण त्याच्याकडे आला. त्याला दुकानासाठी लायसन करून पाहिजे आहे. त्यावेळी जगन्नाथ यांनी एका मित्राची ओळख आहे त्याची ओळख घालून देतो असे सांगितलं. त्याप्रमाणे जगन्नाथ यांनी कुरेशी भाईची ओळख आपल्या मित्राशी करून दिली. त्या मित्राचे नाव रमेश असे होते. त्याने कुरेशी यांची ओळख त्यांचे आधार कार्ड वगैरे बनवणाऱ्या एजन्सी आहेत. ज्या ठिकाणी सर्व सरकारी कामे केली जातात. आपले सरकार या ठिकाणी असलेल्या राजन नावाच्या माणसाची ओळख करून दिली की, हा माणूस तुम्हाला तुमचं काम करून देईल. राजन यांनी कुरेशी यांना ठराविक रक्कम सांगितली ती कुरेशी द्यायला तयार झाले. अर्धी रक्कम देण्याचे ठरवलं त्यावेळी कुरेशीने राजन यांना २५ लाख रुपये दिले आणि त्यावेळी ॲग्रीमेंट बनलं. प्रतिज्ञापत्र बनवण्यात आलं की कुरेशी यांनी राजन यांना २५ लाख दिलेले आहेत. अमुक अमुक दिनांक आणि ते कोणत्या कामासाठी दिलेले आहेत. जर काम झालं नाही तर ते पैसे परत राजन कुरेशी यांना करणार. त्याच्यात असेही नमूद केलेलं होतं की दोन्ही पार्टी जर यात नसतील, तर त्यांच्या वारसांनी हा व्यवहार पूर्ण करावा. त्यासाठी त्याच्यावर साक्षीदार म्हणून ओळख करून देणारा जगन्नाथची व रमेश यांनी साक्षीदार म्हणून सही केली. कारण कुरेशी हा जगन्नाथ यांना ओळखत होता. जगन्नाथच्या मार्फत रमेशची ओळख झालेली होती आणि रमेशने राजन यांची ओळख करून दिलेली होती. व्यवहार हा कुरेशी आणि राजन यांच्यात झालेला होता. पण जगन्नाथ आणि रमेश हे दोघांना ओळखत असल्यामुळे ते साक्षीदार झाले होते. दोन वर्षे होऊन गेले तरीही राजन काही काम करत नव्हता म्हणून कुरेशी याने त्याच्यामागे पैसे देण्याचा तगादा लावला. राजनने कुरेशींचेच नाहीत, तर अनेक जणांकडून पैसे घेतलेले होते. ते सर्वजण त्याला दम देऊ लागले होते. राजन याने कुरेशी यांना येण्याची १२ तारीख दिली की तुम्ही त्या दिवशी या आणि मी तुम्हाला त्या दिवशी पैसे देतो. कुरेशी आणि त्याच्याबरोबर दोन साथीदार राजनच्या असलेल्या शॉपमध्ये गेले. शॉपच्या बाहेर बघतात, तर पाटी लावलेली होती की राजन यांना श्रद्धांजली. कुरेशी यांनी आजूबाजूला चौकशी केली. तेव्हा समजलं की, राजनने आत्महत्या कालच केलेली आहे. हे ऐकून कुरेशींना धक्काच बसला आणि ते त्यांच्या कुटुंबाला भेटून तिथून निघाले.

दोन दिवसांनी कुरेशींना पोलीस स्टेशनवरून फोन आला. ते तिथे गेले असता त्यांना असं समजलं की राजन याच्या पत्नीने कुरेशी, रमेश आणि जगन्नाथ यांच्यावर तक्रार दाखल केलेली आहे. तीन-चार जणांची नावे होती जे तीन-चार जण होते ते मेन आरोपी होते. कारण त्याने राजनला धमकी देऊन मारझोड केलेली होती. कुरेशीने फक्त पैशांची मागणी केलेली होती म्हणून त्याच्यात त्यांची नावे होती की कुरेशीने दिलेले २५ लाख रुपये. सरकारी अधिकारी जो काम करणार होता त्याला १५ दिले आणि रमेश आणि जगन्नाथ यांना पाच पाच लाख रुपये दिले. म्हणजे राजनच्या पत्नीने असं दाखवलं की जे पैसे मिळाले ते आम्ही साक्षीदार जे होते त्यांनाच दिले. दहा लाख रुपये आणि पंधरा लाख सरकारी अधिकाऱ्याला दिले. आम्ही त्यातले काहीच घेतले नाही. साक्षीदार असलेले जगन्नाथ आणि रमेशने फक्त त्या प्रतिज्ञापत्रावर सही घेतली होती पण पैसे काही घेतले नव्हते. ते फक्त त्या प्रतिज्ञापत्राशी साक्षीदार होते आणि कुरेशीची ओळख रमेशशी जगन्नाथ यांनी करून दिली होती. रमेशने कुरेशीची ओळख राजनशी करून दिली होती. ओळख करून दिल्यामुळे ते साक्षीदार झाले होते. आज राजनने आत्महत्या केल्यामुळे ते आता साक्षीदाराचे आरोपी झालेले होते.

राजनच्या पत्नीने आरोप केला होता की, या लोकांच्या त्रासाला कंटाळून माझ्या पतीने आत्महत्या केली. आज जगन्नाथ आणि रमेश हे व्यवहारातील साक्षीदार होते पण आज तेच कुठेतरी फसले होते आणि आरोपी झालेले होते. राजनने अनेक लोकांचे पैसे थकवले होते. अनेक लोकांकडून त्यांनी पैसे उचललेले होते आणि ते देता येत नव्हते म्हणून त्याने आपल्या आयुष्याचा शेवट केला होता. पण जे साक्षीदार होते ते मात्र आता या सगळ्या गोष्टींमध्ये बसलेले होते. अटक होऊ नये म्हणून या सर्वांनीच अटकपूर्व जामीन घेतलेला होता पण कोर्टाचा फेरा मात्र त्यांना आता चुकलेला नव्हता. **(सत्यघटनेवर आधारित)**

# गुणसुंदर...





स्नेहधारा
पूनम राणे

अधिकाराची खुर्ची आपल्याला ईश्वरी कृपेने मिळते. त्या खुर्चीला शोभा कशी आणायची, हे आपल्या हातात असते. कारण मोठं पद मिळणं महत्त्वाचं नसतं. पण पदाला मोठं करणं, हे फार महत्त्वाचं असतं. अशाच आपल्या पदाला आपल्या कर्तृत्वाने मोठं करणाऱ्या स्वर्गवासी नीलाताई सत्यनारायण, यांची ही कथा.

बाबा... बाबा ... ''ताई गोरीपान"... आणि मी मात्र सावळी का...? असं म्हणून उदास चेहरा करून बसली असता, वडिलांनी तिला जवळ घेतलं आणि म्हणाले, ''हे बघ, ती रूपसुंदर आहे आणि तू गुणसुंदर." लक्षात ठेव... गुणसुंदर, माणसं जगात हवीहवीशी वाटतात. मग नीलाताईंनी मागे वळून पाहिलंच नाही. त्यांनी आपल्या कर्तुत्वाने गुणसुंदर व्हायचे ठरवले.

वडिलांना आयएएस व्हायचे होते; परंतु त्यांना ते शक्य झाले नाही. ते पोलीस सेवेत होते. पोलीस खात्यात राहूनही संत वृत्तीचा अधिकारी अशी त्यांची ख्याती होती. कारण त्यांची बैठक अध्यात्माची होती. भारतीय संस्कृतीची बाळगुटी त्यांनी मुलांना लहानपणीच पाजली होती. अर्थात, मुलांना वाढवताना त्यांनी संस्कार दिले. मुलींना वाढविताना मुलांसारखे वाढविले.

वडील पोलीस दलात असल्यामुळे त्यांच्या सतत बदल्या होत असत. त्यामुळे नीलाताईचे शिक्षण वडिलांच्या बदलीच्या निमित्ताने मुंबई, पुणे, नाशिक, दिल्ली अशा वेगवेगळ्या ठिकाणी झाले. त्या अत्यंत हुशार विद्यार्थिनी होत्या. बीए आणि एमए परीक्षांमध्ये विद्यापीठात त्यांनी मानांकन मिळविले. वडिलांची आयएएस होण्याची इच्छा त्यांनी पूर्ण केली.

कोणतीही आव्हानात्मक जबाबदारी स्वीकारणे हे त्यांचे खास वैशिष्ट्य होते आणि ती जबाबदारी त्या जिद्द, चिकाटीने, मेहनतीने पार पाडत असत.

आयएएस झाल्यानंतरही अनेक मानाची पदे त्यांनी भूषवली. उपजिल्हाधिकारी, मंत्रालयातील समाज कल्याण, सांस्कृतिक, शिक्षण, नगर विकास, आरोग्य, महसूल, वन विभाग अशा विविध विभागांच्या सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले. सचिव पदावर काम करत असताना अहंकाराचा स्पर्श त्यांना केव्हाच झाला नाही. खेड्यापाड्यांतून अडचणी घेऊन येणाऱ्या माणसांचे प्रश्न त्या सहज सोडवत असत. प्रशासक म्हणून काम करत असताना जनतेचे प्रश्न सोडवणे, हे आपले प्रथम कर्तव्य आहे. याचे भान त्यांनी कायम ठेवले.

श्री व्यंकट सत्यनारायण यांच्याबरोबर वयाच्या २३ व्या वर्षी नीलाताईंचा विवाह झाला. दोन अपत्यांना त्यांनी जन्म दिला; परंतु दैवाने त्यांच्यासमोर एक आव्हान उभे केले. मुलगी हुशार, पण मुलगा मात्र मतिमंद निघाला. मंत्रालयातील एक कार्य तत्पर सचिव म्हणून पूर्णवेळ सेवा करताना आणि विशेष मुलांचा सांभाळ करताना त्यांची त्रेधातिरपीट उडत असे; परंतु आयुष्याची लढाई त्यांनी रडून नाही, तर लढून जिंकली आणि आपले आईपण सदैव जपले. एक पूर्ण-अपूर्ण नावाचे पुस्तक विशेष मुलांच्या, पालकांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी त्यांनी लिहिले.

त्यात त्या लिहितात, ''परमेश्वर जेव्हा आपल्याला एखादी अडचण देतो, तेव्हा त्या अडचणींसोबत एक भेटवस्तू सुद्धा पाठवत असतो. ती भेटवस्तू म्हणजे त्यातून मिळणारा अनुभव."

हे पुस्तक वाचून त्यांना भेटण्याचे ठरवले. तो योगही माझ्या व माझ्या विद्यार्थिनींच्या आयुष्यात आला. त्यांची मुलाखत घेण्याचं भाग्य आम्हाला लाभले.

निवृत्तीनंतर सरकारने त्यांना अत्यंत महत्त्वाची जबाबदारी दिली. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक आयुक्त या पदावर त्यांची नियुक्ती केली. ही जबाबदारी पाच वर्षे त्यांनी सांभाळली.

त्या म्हणत, प्रशासकीय सेवा ही रोजी-रोटीची असते; परंतु संगीत, साहित्य आणि कुटुंबातील प्रेम हा आपला आत्मा असतो. त्या साहित्यिका होत्या. अनेक चित्रपट, गीते त्यांनी लिहिली. त्याचबरोबर मातीची मने, अग्निपुष्प आषाढ, आकाश पेलताना... अशी साहित्य निर्मिती केली.

# आपण कुठे चाललोय...



मनस्विनी
पूर्णिमा शिंदे

जीवनगाणे गातच राहावे... काय म्हणता राव! इथे गायला कोणाला वेळ आहे? बोलायला सुद्धा नाही! कामापुरता मामा आणि ताकापूर्ती आजी. आजकाल या फार्स्ट लाईफ गतिमान युगामध्ये आपण सारेजण अतिशय संकुचित वृत्तीचे झालेले दिसून येतो. काम काय तेवढे बोला, मुद्द्याचं बोला. प्रत्येकाला दुसऱ्याला समजून घेण्यासाठी वेळ नसतो. काम झालं की पाठ फिरवणारे आणि कामापुरते गोड गोड बोलणारे दैनंदिन जीवनात पाहायला मिळतात. हल्ली माणसं संवेदनशील कमी आणि प्रॅक्टिकल जास्त झालेली आहेत. प्रत्येक क्षेत्रामध्ये याचा अनुभव मिळतो. क्षेत्र कोणतेही असो पण प्रत्येकाला समोरच्याला अटेंड करायला वेळ तरी मिळतो का? फोनवर सुद्धा नाही वर्षानुवर्ष तोंड पाहिले नाही तिथे नाती जुळतात आणि वर्षानुवर्ष रक्ताचे संबंध असून नजर भेट नाही. मुश्किलीने बोलून टाकायचं नाहीतर मोबाईल संदेश द्यायची. तिथे संवेदना नाही. भावना नाही. काय आपण एकमेकांना समजून घेणार आहोत? त्यामुळे भावनेचा ओलावा नष्ट होत चालला आहे. म्हणून माणूस माणसापासून लांब चाललाय. संवाद हरवलाय. सुखदुःखात दिखाऊपणा म्हणून माणसे एकत्र येतात. तीच काय ती वर्षानुवर्षाचे एखादी भेट असेल, तर जायलाच पाहिजे. कर्तव्य म्हणून केलेच पाहिजे. पण जबाबदारीचे भान मात्र नसतेच. सामाजिक बांधिलकी, सामाजिक भान आणि माणूस म्हणून माणुसकी आता शिल्लक राहिलेली नाही.

प्रत्येक गोष्टीचा इव्हेंट केला जातो. जीवन काही रील नाहीये की रील काढायची आहे आणि लगेच पोस्ट करायची. किती लाईक येतात पाहू? असं नसतं ते आपणच त्याला यंत्रामध्ये वेळेच्या काट्यांमध्ये काटेरी करून ठेवले. हे आधुनिक जीवनशैली आणि पाश्चात्य अंधानुकरणाचे काटे, वेळेची मर्यादा, मोजून, मापून, संकुचित वृत्तीने एकमेकांशी जे वागलं जातं. त्यामध्ये नैसर्गिकता, प्रेमाचा ओलावा नाहीच राहिला. माणूस माणसापासून लांब जात आहे. पूर्वीच्या काळी मे महिन्याची सुट्टीत घर, अंगण गलबलून जायचं. त्या अंगणामध्ये झाडावरचे पक्षी, प्राणी पाखरं सुद्धा येत असत. त्या चिमण्या पाखरांशी बोलत असत. आता सुट्ट्या हरवल्यात माणसं हरवली, संवाद हरवला, नाती हरवली, तो आदर, जिव्हाळा, ओढ, आपुलकी संपुष्टात येऊन केवळ आणि केवळ सगळे इव्हेंट झालेत. दिखाऊपणा सगळ्याचं मोजमाप पैशात केलं जातं. पैसाच सर्वश्रेष्ठ आहे. अपेक्षांचा ओझं लादलं जातं, या भीती, नैराश्य, दडपणामुळे माणूस मात्र नैराश्यवस्थेत वयोमान करत चाललाय. अपेक्षा ठेवूनच माणूस दुखी होऊ लागला आहे. पूर्वीच्या गरजा मर्यादित होत्या. चैन मुळीच नव्हती. तेव्हा माणसे सुखी होती. समाधान मानण्यावर असतं. पण ही स्पर्धा तेव्हा नव्हती. जिकडे पाहावे तिकडे आता स्पर्धांची गर्दी, सुळसुळाट झाला आहे. प्रत्येक गोष्टींचा इशू केला जातो. प्रत्येक भावनेला तिलांजली दिली जाते. नको त्या गोष्टीला खतपाणी घालून ते फोफावले जाते. यात चांगलं काय आणि वाईट काय याचा मात्र माणसाला विसर पडला आहे. सर्वस्वी अखंड माणूस बुडाला आहे. तो ऐहिक आणि भौतिक सुखाच्या आड पुरता गटांगळ्या खातोय. आत्मचिंतन, आत्मपरीक्षण हे फक्त संतांच्या महंतांच्या शब्दांना पूर्णपणे विसरलो आहोत.

**"अवघाची संसार सुखाचा करीन"**

संतांची ही उक्ती मागे पडली आहे. एक काळ होता संत एकनाथ आपली भाकरी पळवली म्हणून लोण्याची वाटी घेऊन जनावरालाही देव मानत. त्याच्या मागे धावत होते. पण आज मात्र माणूस माणसाला जनावरासारखं वागवू लागलाय. देवाचीही भक्ताशी कमिटमेंट होती. एकेकाळी शबरीची उष्टी बोरे खाणारे श्रीराम आणि आता देवालाही न घाबरता माणुसकीला लाजवतील असे कर्म करणारे पुढारी, सेवक असतातच. आम्ही बांधव सारे एक आहोत. ही संविधानाची, समानतेची प्रार्थना पुस्तकाच्या पहिल्या पानावरच स्थिर विसावलेली आहे, बाकी सारं विस्कळीत. तळागाळातील उद्धार होण्यापेक्षा उद्ध्वस्त होण्याकडे जास्त कल झालाय. आपलीच पोळी भाजून घेण्याच्या नादात माणूस मात्र खुळा झालाय. सत्य आणि न्यायाला मात्र कलियुगात काळं फासलं जातं आणि खाईल त्याच लबाडाचं मात्र तोंड मोठं दिसून येतं.

**जाणत्याची संगत धरावी, जाणत्यांची सेवा करावी, जाणत्याचे जाणावे प्रसंग, जाणत्यांचे घ्यावे रंग**
**जाणे त्याच्या स्मृतीची तरंग अभ्यासावे.**

समर्थ रामदासांच्या या पंक्तीत जाणते पण महत्त्वाचे आहे. हे "जाणते पण" असून सुद्धा आपण विसरतो! कारण आपल्या ठाई बालिश, स्वार्थ असतो. यावरील पंक्तीतून विचारी, विवेकी, अभ्यासू याविषयीचे विवेचन करून उत्तम उदाहरण दिले आहे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर हे उदाहरण महत्त्वाचे आहे. अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण व अनुभूती मिळवावी. एकूणच आपले व्यक्तिमत्व हे आपल्या अवतीभोवती असणाऱ्या समाजासाठी महत्त्वाचे आहे. सगळेच लोणी आपल्याच पोळीवर ओढणारे, स्वतःचाच विकास करत असतील. पण कधीतरी मदर टेरेसा, रतन टाटा, बाबा आमटे, सिंधुताई सकपाळ होऊन बघा.


"मरावे परी किर्ती रुपी उरावे" हा कर्तृत्व सुगंध आपल्यानंतरही असाच सगळ्यांचे जीवन सुगंधित करेल. रामायणात खारुताई प्रभू श्रीरामचंद्रांसाठी सेतू उभारू शकते. इतिहासात आग लागली असताना चिमणी चोचभर पाण्याने आग विझवू शकते. वानर सेना धर्मासाठी कंबर कसते.

आपण तर माणसं आहोत! बुद्धी आणि वाणीने श्रेष्ठ मग आपण काय आणि किती केलं पाहिजे? नव्हे नव्हे सर्वप्रथम माणूस म्हणून कसे वागले पाहिजे! संत कवयित्री बहिणाबाईंच्या काव्यपंक्ती,

***"माणसा माणसा कधी होशील रे माणूस***
***लोभासाठी झाला माणसाचा रे कानूस"***

# मैत्र जीवांचे...





हलकं-फुलकं
राजश्री वटे

मानवी जीवनात महत्त्वाची भूमिका असते पुस्तकाची... म्हणतात ना "वाचाल तर वाचाल''... लहानपणापासून ते डोळे शाबूत आहेत तोपर्यंत यांची सोबत लाभते. एकटं असो, सगळ्यांमध्ये असो, प्रवासात असो... घरात, अंगणात, पायरीवर, गच्चीवर, बगीच्यात, जिथे तिथे अगदी सगळीकडे याची कंपनी हवीहवीशी वाटते... फक्त आतील पांढऱ्या कागदावरील काळ्या अक्षरांशी मैत्री झाली पाहिजे. ही मैत्री... या मैत्रीचं वेड तुम्हाला कायम सोबत करते. आयुष्यातील कुठल्याही वळणावर एकटं पडू देत नाही. मार्गदर्शन करतं, समुपदेशन करतं... कुठल्याही कठीण मनस्थितीत आधार देतात पुस्तकं!!

पुस्तकं वाचतो, वाचत जातो, समजत जातं, त्यांचा लळा लागतो व त्यांच्या प्रेमात पडतो... इतकं की रोज एक पुस्तक तरी वाचलंच पाहिजे... असं स्वतःच स्वतःला एक बंधन घातलं जातं... हा आग्रह नसतो ही आवड असते... एक हुरहूर असते... असं मनासारखं घडलं की जीव सुखावतो वाचकांचा ... ज्याला हे वेड असतं ना त्यालाच हे सुख कळतं बरं!!

दोन वाचनवेडे भेटले की, विषयाला अंत नसतो... कुठून कुठे फिरवून आणतं...

पुस्तकं सगळ्या भाषांवर प्रेम करतं व वाचणाऱ्यालाही प्रेम करायला शिकवतं... नाही नाही भाग पाडतं... पण जी भाषा किंवा मातृभाषा मनावर, हृदयावर खोल झिरपत जाते त्याच शब्दांचं... त्याच पुस्तकांचं आकर्षण वाढतं व वाचनाचा नाद लागतो.

व्यक्तिमत्त्व विकासाची मूळ सुरुवातच वाचन आणि निरीक्षण याने होते व एक सकारात्मक व्यक्तिमत्त्व घडत जातं!

पहिल्या चहाच्या घोटाबरोबर एक आवडीचं पुस्तक हातात म्हणजे... क्या बात है... दिन बन जाता है!!

दुपारी लोळता लोळता वाचताना कधी कधी जी झपकी येते ना ती कुशीत पुस्तक घेऊन किंवा पुस्तकाच्या कुशीत शिरून... ब्रम्हानंदी लागते टाळी... सुख म्हणजे हेच ना!!

अरे... वाचणारे पुस्तकांचे इतके चाहते असतात की घरात सामानापेक्षा पुस्तकांनीच जागा काबीज केली असते... ही त्या वाचनवेड्याची संपत्ती असते, हे ऐश्वर्य जपण्याचा आनंद तो उपभोगत असतो... हाच सुखी माणसाचा सदरा!! काही वाचणारे महाभाग, तर असे असतात की दोन दिवसांत एक पुस्तक झालंच पाहिजे असा नियम स्वतःलाच घालून घेतात... मग मोबाईल सुद्धा बाजूला सारतात... अशा पुस्तक वेड्यांना खरंच मनापासून नमस्कार! काही वाचक वर्षाला शंभर असाही रेकॉर्ड करतात... खरंच असे वाचक मनापासून पुस्तक जगतात.

पुस्तकांनाही अशा वाचकांची सवय होऊन जाते... अरे एक दिवस जरी पुस्तकाच्या कपाटाकडे वाचक फिरकला नाहीतर रुसूनही बसतात म्हणे ते (कविकल्पना) मग जरा गोंजारलं तर खूष होतात ते!

खूप अस्वस्थ असाल, काही सुचत नसेल, एकटं एकटं वाटत असेल किंवा एकटं रहावंसं वाटत असेल, तर अशावेळी फक्त पुस्तकाची सोबत घ्यावी व तेच योग्य सोबतीची गरज पूर्ण करतं!

पुस्तकातील शब्दच नव्हे तर, त्याचे मुखपृष्ठ देखील कधीकधी इतकं बोलकं असतं की ते वाचकांशी संवाद साधतं... विचार करायला लावतं व ते विचार कुठल्या कुठे फिरवून आणतात. तसेच लेखकांशीही वाचक मनानी जोडल्या जातो, त्यांच्यात एक अदृश्य धागा जोडला जातो... कधीकधी एखाद्या लेखकाच्या पुस्तकाच्या प्रेमात वाचक असतो की कुठल्याही पुस्तक प्रदर्शनात त्याची नजर फक्त तोच लेखक शोधत असतो. इतका त्या लेखकांच्या पुस्तकाचे गारुड त्याच्या मनावर झालेलं असतं.

पण खरी वास्तवता ही आहे की, हातात पुस्तक अगदी हृदयाच्या जवळ धरून वाचणारी पिढी जवळ जवळ संपुष्टात येते आहे... कारण सगळं आता त्या तीन-चार इंचाच्या डबीत समावलं आहे... पण त्यावर फक्त वाचन होतं... संवाद घडत नाही हे नक्की... पटतंय ना!!

पुस्तक आणि मस्तक हे एकमेकांना पूरक आहेत. पुस्तकातून जे मस्तकात... व मस्तकातून जे हृदयात उतरतं ते खरं रसायन!!

मग...
वाचताय ना...
वाचलंच पाहिजे!!!

# साप्ताहिक भविष्य





मंगेश मधुसूदन महाडिक
२० ते २६ एप्रिल २०२५

## आर्थिक परिस्थिती मनासारखी राहील

**मेष**

हा आठवडा आपल्याला अनुकूल स्वरूपाचा जाईल. आपल्या प्रयत्नांना यश आल्यामुळे आत्मविश्वासात वृद्धि करणारा ठरेल. आपल्या समोरील कामे आपण वेगाने कराल. व्यवसाय-धंद्यामध्ये नवीन योजना तसेच नव्या संकल्पना राबवण्याचा प्रयत्न यशस्वी होईल. भागीदारीच्या व्यवसायात वादविवाद टाळा. व्यवसायाचे हित लक्षात घ्या. नोकरीच्या ठिकाणी काही क्लिष्ट समस्या आपण सोडवू शकाल. वरिष्ठांबरोबर असलेले संबंध सुधारतील. आपल्या कामाची दखल घेतली जाईल. प्रवासाचे योग आहेत. काही कारणानिमित्त जवळचे तसेच दूरचे प्रवासाचे नियोजन होईल. आर्थिक परिस्थिती मनासारखी राहील. व्यावहारिक उलाढालीमध्ये आर्थिक लाभ होतील.

## नवीन करारमदार करू शकाल

**वृषभ**

या सप्ताहात आपल्याला आपल्या कार्यक्षेत्रात नवीन नवीन संधी उपलब्ध होतील. त्याचे सोने करणे आपल्याच हातात आहे हे लक्षात ठेवा. इतरत्र वेळ वाया न घालवता कार्यमग्न राहणे महत्त्वाचे ठरेल. आलेल्या नवीन संधीमुळे आपले रोजचे जीवन बदलू शकते. प्रगती उन्नती करू शकाल. आर्थिक बाजू भक्कम राहिल्याने आपल्या मनातील नियोजन आपण प्रत्यक्षात आणू शकाल. व्यावसायिक जुनी येणी वसूल होतील. नवीन करारमदार करू शकाल. व्यवसाय विस्ताराच्या दृष्टिकोनातून योग्य कालावधी आहे. नवीन संकल्पनांचा वापर फायदेशीर ठरेल. भागीदारी व्यवसायात भागीदाराचे मत व्यावहारिकदृष्ट्या महत्त्वाचे करू शकते. नोकरीमधील वातावरण सर्वसामान्य राहील.

## हाती घेतलेल्या कामामध्ये यश मिळेल

**मिथुन**

हाती घेतलेल्या कामामध्ये यश मिळेल. कामानिमित्त जवळचे तसेच दूरचे प्रवास करावे लागतील. काही महत्त्वाच्या कामांमध्ये अचानक उद्भवलेल्या समस्या शांतपणे व प्रयत्नाद्वारे सोडवू शकाल. इतरांची मदत मिळेल. इतरांशी सौजन्याने व विनयशीलतेने वागण्याची गरज आहे. व्यवसाय-धंद्यात काही वेळेस आर्थिक गरज निर्माण होऊ शकते. कामगारांचे प्रश्न उपस्थित होऊ शकतात. त्याकडे सकारात्मक दृष्टिकोनाने पाहा. राजकारणात सक्रिय असलेल्या जातकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. तसेच शत्रू व हितशत्रूंच्या हालचालींवर लक्ष ठेवून राहा. आपल्या ध्येयाच्या पाठपुराव्यावर लक्ष केंद्रित करणे हिताचे ठरेल.

## महत्त्वाच्या व्यक्तींकडून मार्गदर्शन

**कर्क**

दीर्घकाळ रखडलेली अथवा प्रलंबित राहिलेले जमिनीचे तसेच स्थायी मालमत्तेचे व्यवहार गतिशील होऊन त्याचा पूर्णत्वाकडे प्रवास होईल. समाजातील काही मान्यवर व सन्माननीय व्यक्तींकडून आपल्याला मदत मिळू शकते. महत्त्वाच्या व्यक्तींकडून मार्गदर्शन लाभेल. मित्रमंडळींच्या परिवारातून मदत मिळेल. कुटुंबातील ज्येष्ठांचे आशीर्वाद लाभतील मात्र प्रामाणिकपणे आपल्याला प्रयत्न करायला हवेत. मन शांत ठेवून दृढ निश्चयाने निर्णय घ्या. आर्थिक लाभ संभवतो. विद्यार्थ्यांना अपेक्षेप्रमाणे यश मिळेल. उच्च शिक्षणाचे मार्ग प्रशस्त होतील. गुरुजनांचा आशीर्वाद मिळेल.

## कार्याचा ठसा उमटविण्यात यश

**सिंह**

आपल्या कार्यक्षेत्रात आपल्याला काही अनपेक्षितरीत्या संधी मिळू शकतात. कामात यश मिळेल. रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी उपयोगी कालावधी. आपल्या कार्यक्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविण्यात यश मिळेल. कुटुंब परिवार तसेच आपल्या व्यवसाय-धंद्यात अथवा नोकरीत इतरांचे अपेक्षित सहकार्य मिळाल्यामुळे आपल्या समोरील कामे सहज होतील. जोडीदाराशी मधुर संबंध राहतील. सहकुटुंब, सहपरिवार प्रवासाचे योग आहेत. प्रवास सुखकर होतील. धनलाभ होण्याची शक्यता आहे. नोकरीमध्ये पदोन्नती अथवा वेतन वृद्धिचे योग आहेत.

## सतर्क राहणे आवश्यक

**कन्या**

सध्याचा कालावधी अनुकूल असला तरी काही बाबतीत आपल्याला सतर्क राहणे आवश्यक ठरणार आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या नियोजन करावे लागण्याची शक्यता आहे. व्यवसाय धंद्यातील परिस्थिती समाधानकारक राहील. उलाढाल वाढेल परंतु जबाबदाऱ्या व खर्चही त्याच प्रमाणात वाढल्याने गोंधळून जाण्याची शक्यता. व्यावसायिक समस्या शांतपणे विचार करून मार्गी लागतील. भागीदारी व्यवसायात भागीदारामुळे प्रश्न संपुष्टात येतील. आर्थिक मदत मिळू शकते.

## रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक

**तूळ**

भाग्याची साथ मिळाल्यामुळे रखडलेली किंवा अर्धवट अवस्थेतील असलेली कामे पूर्ण करण्यासाठी अनुकूल कालावधी आहे. व्यवसाय-धंद्यात अपुरे राहिलेले प्रोजेक्ट आता पूर्ण होतील. पण प्रयत्न मात्र त्यादृष्टीने केल्यास त्यात यश मिळेल. आर्थिक मदत मिळेल. नोकरीमध्ये अनुकूल परिस्थिती राहील. प्रयत्नांमध्ये सातत्य राहिल्यास आपली कामे आपण पूर्ण करू शकाल. वेळेचा अपव्यय व आळस टाळणे हितकारक ठरेल. महत्त्वाच्या कामांना गती मिळेल. दूरचा प्रवास घडू शकतो. आर्थिक आवक चांगली राहील. मात्र आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

## आपल्याला पाठिंबा मिळेल

**वृश्चिक**

आपण घेतलेले निर्णय अचूक ठरल्याने पुढील कामे करण्यात उत्साह राहील. आपल्या समोरील कामे आपण वेगाने कराल. नवीन कामे हाती घ्यावेसे वाटेल. तसेच त्या दृष्टिकोनातून नवे नियोजनही कराल. व्यवसाय-धंद्यातील परिस्थिती समाधानकारक राहून काही नवीन बदल करण्याचे ठरवाल. हे नवीन प्रकारचे बदल आपल्या व्यवसायासाठी पोषक ठरतील. कुटुंब परिवारातून आपल्याला पाठिंबा मिळेल. बदलत्या परिस्थितीनुसार बदल करावे लागतील. व्यवसाय-धंद्यातील जुनी येणी वसूल होतील.

## आपल्या कार्यपद्धतीची प्रशंसा होईल

**धनू**

आपल्या व्यवसाय-धंद्यात अथवा नोकरीत अनुकूल परिस्थिती राहील. नोकरीमध्ये आपण केलेल्या कामाचे चीज झाल्यासारखे वाटेल. वरिष्ठांकडून कौतुकास पात्र ठराल. एखादी महत्त्वाची नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. परदेशगमनाचे योग आहेत. त्याचा फायदा पण होईल. आर्थिक परिस्थिती उंचावेल. जे जातक नोकरीच्या शोधात होते अशा जातकांचा नोकरीविषयक शोध संपुष्टात येऊन नोकरीसाठी बोलावणे येऊ शकते. बेरोजगारांना रोजगार मिळू शकतो.

## सहकार्य मिळत राहील

**मकर**

सदरील काळामध्ये कधी चांगले, तर कधी गोड अनुभव येतील. दैनंदिन कामे सुरळीतपणे पार पाडू शकाल; परंतु महत्त्वाच्या कामांमध्ये समस्या तसेच विलंब होऊ शकतो. त्यामुळे स्वभाव चिडचिडा होण्याची शक्यता आहे. आपला राग कुटुंबीयांवर काढू नका. स्वतः आपल्या कार्यामध्ये प्रयत्नशील व कार्यरत राहिल्यास यश आपलेच आहे हे लक्षात ठेवा. वेळेचे नियोजन उपयोगी पडू शकते. खर्चात वाढ होऊ शकते. काही खर्च अचानक करावे लागतील. घरामध्ये अचानक पाहुण्यांचे आगमन चकित करू शकते. कुटुंबामध्ये एखादा कार्यक्रम करण्याचे नियोजन होईल. सहकाऱ्यांचे सहकार्य मिळत राहील.

## अध्यात्मिकतेमध्ये प्रगती करू शकाल

**कुंभ**

आपण कार्य करीत असलेल्या कार्यक्षेत्रात चांगली प्रगती होईल. नवीन नवीन संधी चालून येतील. आळस झटका. नोकरीमध्ये ज्या जातकांची प्रगती अथवा पदोन्नती थांबल्यासारखी झाली होती अशांची प्रगती होऊन पदोन्नती वेतन वृद्धी होईल. या काळात आपल्या बुद्धी कौशल्याचा तसेच वाणीचा प्रभाव दिसेल. जीवनातील अपेक्षित सेवा सुविधा मिळतील. कुटुंब परिवारातून सर्व सदस्यांचे वाढते सहकार्य मिळेल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. धार्मिक सामाजिक क्षेत्रात आपली रुची वाढेल. हातून दानधर्म होण्याची शक्यता. धार्मिक पवित्र स्थळी भेट देण्याचे योग. गूढ विद्येविषयी उत्कंठा दाटून येईल. अध्यात्मिकतेमध्ये प्रगती करू शकाल. उत्पन्नाचे नवीन मार्ग शोधाल.

## कार्य पूर्ततेचा आनंद मिळेल

**मीन**

आपल्या आजूबाजूस अनुकूलतेचे प्रमाण वाढलेले आपल्याला अनुभवता येईल. थोड्याच प्रयत्नांनी दैनंदिन कामे होत असलेली बघून आत्मविश्वास बळावेल. नवीन कामे हाती घ्याल. उत्साह व आत्मविश्वास वाढेल. नवीन नियोजन करू शकाल. एखादे महत्त्वाचे काम बरेच दिवस होण्याची वाट आपण बघत होता ते काम झाल्यामुळे इच्छापूर्तीचा आनंद घेऊ शकाल. कार्य पूर्ततेचा आनंद मिळेल. आपल्या प्रयत्नांना यश मिळून अपेक्षेप्रमाणे गोष्टी घडतील. कुटुंबातून जीवनसाथीची साथ आपल्याला मिळेल. कुटुंबातील मुलींकडून यशदायक वार्ता कानी आल्यामुळे कुटुंबातील वातावरण आनंदी आणि उत्साही राहील.

# काव्यरंग



## वारा गाई गाणे

वारा गाई गाणे प्रीतीचे तराणे
धुंद आज वेली, धुंद फूल-पाने

रंग हे नवे, गंध हे नवे
स्वप्न लोचनी वाटते हवे
हा निसर्ग भासे विश्वरूप लेणे

या निळ्या नभी मेघ सावळे
कल्पनेस मी पंख लाविले
झेलते पिसांवरी हे सतेज सोने

आज वेड हे कुणी लाविले
अंतराळी का पडती पाऊले
कशी सोडवू मी सुखाचे उखाणे

**गीत : जगदीश खेबूडकर**
**स्वर : लता मंगेशकर**

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# मराठवाडा अर्बनमध्ये घोटाळा

कारवाई

## लेखापरीक्षकासह २४ जणांवर गुन्हा

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:संस्थेत जमा झालेल्या ठेवीच्या नोंदी व कर्ज रकमेच्या नोंदी संगणकावर न करता बनावटदस्तऐवज करून ठेवीदारांना ठेऊन पावत्याव कर्जदारांना बेबाकी प्रमाणपत्र दिल्या. याप्रकरणी मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीटसोसायटीचे संचालक मंडळ व कर्मचारी,धनदांडगे मालमत्ता खरीददार व या सोसायटीच्या लेखापरीक्षकासह २४ जणांवर माजलगाव शहर पोलीस ठाण्यात लेखापरीक्षा वर्ग २ त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगाव शहरातील मोंढा भागात असलेल्या मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२३ चे फेर लेखापरीक्षण विशेष लेखा परीक्षक वर्ग २ सहकारी संस्थेचे सतीश काकासाहेब पोकळे यांनी केले. त्यांनी याचा अहवाल वरिष्ठांना सादर केला. या अहवालात असे नमुद केले आहे की, समृद्ध मराठवाडा मल्टीस्टेट व्हिकल सर्विसेस को- ऑप सोसायटी या नावाने कॅश क्रेडिट ९ कोटी ३९ लाख ७० हजार ८२१ मुदत




ठेवींमधील अपहार श्रीराम मच्छिंद्र बहिर६ लाख, सुहास संपत जाधवर ३० लाख,कर्ज वितरणातील अपहार व गैरव्यवहार ५ कोटी ५० लाख रूपये केला. असा सर्व मिळुन १५ कोटी २५ लाग ७० हजार ८२१ रूपयांचा समावेश आहे. या अपहारास जबाबदार असलेल्या २४ जणांबाबत तक्रारीत उल्लेख करण्यात आला आहे या प्रकरणी मराठवाडा अर्बन को- ऑप क्रेडीट सोसायटीचे अध्यक्ष सतीश गंगाधर सावंत, गणेश त्रिंबकराव शेळके, महिंद्र मनमोहन मानधने, विशंभर पांडुरंग शिंदे, शिवाजी लक्ष्मण गडदे, अनिता पृथ्वीराज होते, सुनिता भास्करराव खटले, सुमित बाळकृष्ण भावसार, योगेश एकनाथ घुले, पोपट शिवाजी आवाड (वरील सर्व संचालक), मुख्य कार्यकारी अधिकारी किशोरी सतीश सावंत व गजानन विठ्ठलराव डासाळकर, व्यवस्थापक अमोल सुखदेव अंधारे, रविकिरण मधुकर दहिवाळ भाग्यश्री गगानन डासाळकर, गुलाबाई रूपाजी अंधारे, अंजली अमोल अंधारे, अशोक आता गिरी (वरील सर्व संस्थेचे कर्जदार), लेखापरीक्षक एस. बी. गायकवाड व किरण कमलाकर सावजी, समर्थ मराठवाडा मल्टीस्टेट व्हिकल सर्विसेस को-ऑप सोसायटी लि. माजलगाव या संस्थेचे संचालक मंडळ यांचा समावेश आहे. माजलगाव येथील धनदांडगे व होलसेल व्यापारी धनराज प्रेमराज बंब व विजयराज हेमराज बंब या दोघांनी जिल्हा बीड संस्थेत तारण असलेली मालमत्ता बनावट दस्ताऐवज आधारे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संगनमत करून संस्थेच्या अनेक मालमत्ता खरेदी केल्याचे उघड झाले. त्यावरून या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महावितरणकडून अर्थपूर्ण दुर्लक्ष

## बोंबला:एजन्सीवर लाखोंचा खर्च



पुण्यभूमी प्रतिनिधी

केजः शहरातील विविध भागांत वाकलेले विद्युत पोल त्यावरून ओढलेल्या तारा जमिनीपासून खूप कमी उंचीवर लोंबकळत आहेत. यामुळे वीजपुरवठा रात्री-अपरात्री ऐन उन्हाळ्यात बंद होत आहे. अशा घटना घडू नयेत म्हणून त्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी महावितरणकडून लाखो रुपये खर्च करून जिल्ह्यात ३२, शहरात १२ एजन्सीकडे कामे सोपवली आहेत. वारंवार विजेच्या दुर्घटना घडत आहेत. असे असताना देखील या एजन्सी करतात काय, असा प्रश्न उपस्थित जात आहे. महावितरणकडून याकडे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष केले जात आहे. महावितरण विभागाचा गलथान कारभार वारंवार चव्हाट्यावर येत आहे. सध्या उन्हाळा असून, अवकाळी पाच मिनिटांचा जरी पाऊस पडला तरी रात्रभर वीजपुरवठा बंद होत आहे. अनेक ठिकाणच्या तारा लोंबकल्या आहेत, तर पोल पूर्णपणे वाकलेले आहेत. त्यामुळे वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. यांच्या देखभाल दुरुस्त्यांच्या कामासाठी एजन्सींना महावितरणने लाखो रुपयाचे दिले आहेत. मात्र, त्या पैशाने दुरुस्ती केली जाते का, केली पान २ वर

# बाबासाहेब उपेक्षितांच्या प्रगतीसाठी लढले

## पप्पू कागदे: डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी व उपेक्षितांना त्यांच्या हक्काची व अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी जाती व्यवस्था बदलण्याचे काम करीत भारतीय संविधानाची निर्मिती करून भारतीय लोकशाही मजबूत केली. त्याचबरोबर, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय प्रवाहात आणण्यासाठी व साक्षर समाज घडविण्यासाठी शिक्षणाची दारे खुली केली. आपल्या हक्क व अधिकारांसाठी लढण्यास प्रवृत्त केले. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारीत असलेली समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करीत समाज बांधवांच्या प्रगतीसाठी देशभर लढा उभा केला. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त तलवाडा, घाटसावळी, पारगांव (सि), नाळवंडी, ताडसोन्ना या गांवी केले. पुढे बोलतांना पप्पू कागदे म्हणाले



की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून अठरा पगड जातीच्या समाज बांधवांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधानात पान २ वर

# अपहरण करणारा आरोपीला बेड्या

## कारवाई:बलात्कार व पोस्को अंतर्गत गुन्हा

पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा:गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील चव्हाणवाडी येथील अल्पवयीन मुलीला अपहरण करुन आरोपी उमेश केशवराव दाभाडे रा, रेवकी देवकी ता.गेवराई, सदर गुन्ह्यातील फिर्यादीवरून दि.१५/३/२०२५ कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता आरोपी उमेश केशवराव दाभाडे रा-रेवकी देवकी ता. गेवराई जि.बीड याने दिं.-१४/०३/२०२५ रोजी दुपारी ०२.३० वा. सुमारास तिचे पालकाचे कायदेशीर रखवालीतुन तिला फुस लावुन तिचे मोटरसायकलीवर बसवुन अपहरण केले होते. याप्रकरणाचा तपास तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील कोळी यांचेकडे होता. पोलीसांनी याप्रकरणात आरोपीतांचे नातेवाईक व मित्रांना विचारपुस केली परंतु काहीएक हाती लागत नव्हते. आरोपीतांने त्याचा मोबाईल हा गोदावरी नदीचे कॅनोल लगत तलवाडा येथे फेकुन दिला होता.




त्यामुळे आरोपीताचे मोबाईल लोकेशन मिळत नव्हते. आरोपी हा तामिळनाडु राज्यातील एका तेथील स्थानिक लोकांचे मोबाईल त्याचे घरी कॉल येत असल्याचे दिसुन आले.

यावरुन तलवाडा पोलीसांनी तामिळनाडु राज्यात तपासकामी एक पथक पाठविण्याची परवानगी पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची परवानगी घेवुन तामिळनाडु राज्यात सपोनि / सोमनाथ नरके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील कोळी, पोलीस हवालदार हनुमान जावळे असे खाजगी वाहनाने रवाना होवुन नांगावराम पोलीस ठाणे ता. कुलुथलाई जि. करुर (तामिळनाडु) येथे रिपोर्ट केला असता स्थानिक पोलीसांचे मदतीने नेल्लूर ता. कुलुथलाई गावातुन आरोपी उमेश दाभाडे व पिडीत मुलगी यांना ताब्यात घेण्यात पोलीसांना यश आले आहे. आरोपी व पिडीत मुलगी यांना तलवाडा पोलीस स्टेशन पान २ वर

# स्पर्धा परिक्षेत मारली बाजी

## अभिनंदनिय: पुष्पराज खोत यांचा सत्कार



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:नुकत्याच जाहीर झालेल्या देशातील अतिशय प्रतिष्ठित, अवघड यूपीएससी णझडउ परीक्षेच्या २०२४ च्या निकालांमधून धाराशिव जिल्ह्याची शान सटवाई वाडी ता. वाशी जि.धाराशिव या गावचे सुपुत्र श्री पुष्पराज नानासाहेब खोत यांनी ३०४ ठरपज्ञ प्राप्त करून उत्तुंग यश मिळवलं याबद्दल बिक्कड सर मित्र परिवाराच्या वतीने शासकीय विश्रामगृह कळंब या ठिकाणी ह.भ.प.श्री. महादेव महाराज आडसूळ व प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. रमेश जाधवर साहेब,स्व. गणपतराव कथले युवक आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब कथले ,पत्रकार श्री बालाजी बप्पा आडसूळ साहित्य परिषदेचे अध्यक्ष कवी श्री.परमेश्वर पालकर सर, मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड सर व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित पत्रकार बंधू श्री बालाजी बप्पा आडसूळ, श्री परमेश्वर पालकर सर, मंगेश यादव सर, श्री रमेश अंबिरकर सर या बांधवांनी विविध प्रश्न पान २ वर

# जवळा येथे जलतरण प्रकल्प

## कृषी:शासनाचे महत्वकांक्षी धोरण



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: तालुक्यातील जवळा येथे जलतारा प्रकल्पाचे कळंब तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी श्री भागवत सरडे यांनी जलतारा प्रकल्प काय आहे आणि त्याचा उपयोग शेतकऱ्यांना कसा होतो याविषयी माहिती देऊन प्रत्येक शेतकऱ्याने जलतारा प्रकल्प आपल्या शेतात करावा याविषयी आवाहन करण्यात आले जवळा येथील शेतकरी हरिदास माळी यांच्या शेतात जलतारा प्रकल्पाचा प्रात्यक्षिक घेण्यात आले यामध्ये जो खड्डा घ्यायचा असतो तो पाच बाय पाच आकाराचा लांबी रुंदी घेऊन सहा फूट खोल या आकाराचा खड्डा घेण्यात आला. या खड्ड्यामध्ये शेतातील दगड गोळा करून पूर्ण खड्डा भरण्यात आला. या खड्ड्यामध्ये एक एकर क्षेत्रात पडणाऱ्या पावसाचे पाणी हे वाहून येऊन या खड्ड्यात जमा होते जर याचे मोजमाप केले तर जवळपास साडेतीन लाख लिटर पाणी म्हणजेच दहा हजार लिटरचे ३५ टँकर एवढं पाणी हे खड्डा शोषण करून घेतो. म्हणजेच एवढे पाण्याचे भूगर्भात रिचार्ज होऊन पाणी मुरवून भूगर्भ पाण्याच्या बाबतीत सशक्त पान २ वर

# लघु पाटबंधाऱ्यांची चौकशी करा !

## निवेदन:युवराज गलांडे, रोहन गलांडेंची तक्रार



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील चिंचोली माळी येथील लघुपाटबंधाऱ्यांची काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे तसेच पाटबंधाऱ्यांचे काम करुन एक महीना सुध्दा झाला नाही तोपर्यंत पंधाऱ्यांला भेगा पडल्याचे दिसून येते आहे दीसुन आले आहे तरी याविषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की चिंचोली माळी येथे झालेल्या लघुपाटबंधा-यांचे सर्वे नंबर १७ बटे एक मधील लघु पाटबंधाऱ्यांचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे तरी केज पंचायत समितीच्या लघुपाटबंधारे विभागाचे अधिकारी यांनी कॉलीटीकंन्ट्रोल मार्फत मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी रोहन गलांडे पाटील व युवराज गलांडे पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे तरी कॉलीटीकंट्रोल मार्फत चौकशी करण्यात आली नाही तर अमरण उपोषन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे प्रशासनाला निवेदनाद्वारे पान २ वर

दिलासा

परिवहन मंत्री कडे मागणी

# अखेर बस फेरी होणार पूर्ववत

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:जागतिक कीर्तीचे पर्यटन स्थळ लोणार येथे जगभरातील पर्यटक भेट देतात तर लोणार,मेहकर,सिंदखेडराजा आणि रिसोड या चारही तालुक्यातील प्रवाशांना बारामती,फलटण,सातारा आणि मेढा करिता राज्य परिवहन महामंडळाची फेरी उपलब्ध नसल्याने त्यांना बसफेऱ्या बदलून किंवा खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत होता तसेच या भागातील अनेक विद्यार्थी सातारा आणि महाबळेश्वर येथे शिक्षणासाठी स्थाईक असलेले असुन त्यांना सदर फेरी गरजेची होती,सदर फेरी २०१४ ते २०१७ पर्यंत नियमित सुरू होती परंतु थेट प्रवासी नसल्याचे कारण पुढे करून हि एकमेव फेरी बंद करण्यात आली



होती,प्रवासी सेवा संघटना लोणार यांनी फ`री पुर्ववत सुरू करण्याची वारंवार मागणी केली होती परंतु त्यांच्या मागणीकडे विभाग नियंत्रक आणि विभागीय वाहतुक अधिकारी सातारा यांनी दुर्लक्ष केले होते,हे प्रकरण केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे गेले होते त्यांनी दि.०३ एप्रिल २५ रोजी विभाग नियंत्रक,सातारा,परिवहन मंत्री,प्रतापराव सरनाईक आणि उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,डॉ.माधव कुसेकर यांना सदर फेरी पुर्ववत सुरू करण्याची पत्राद्वारे मागणी केली होती त्यांची मागणीची दखल घेऊन सदर फ`री दि. ०१/०५/२५ महाराष्ट्र दिवस पासुन प्रवाशांच्या सेवेसाठी पुर्ववत सुरू करण्यात येत आहे अशी माहिती विभागीय वाहतुक अधिकारी,सातारा यांनी पान २ वर

# रेणुकामाता यात्रा महोत्सव

## परंपरा: विविध उपक्रम पडले पार



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील सातेफळ येथे रेणुकामाता महोत्सव प्रतिवर्षाप्रमाणे उत्साहात संपन्न झाला आहे सातेफळ येथील रेणुका माता यात्रा महोत्सव म्हणजे गावातील रेणुकामाताचे भक्त तसेच बाहेर गावातील भक्त यात्रेनिमित्त सात दिवसांचा उपवास करीत भक्तांनी गावातील देवी देवतांचे अर्शिवाद घेऊन पूजा करून आई राजा उदो उदो, अशा जयघोषात व कुंकवाची उधळण केली. यावेळी भाविकांनी खचाखच भरलेल्या मानाच्या १२ बैलगाड्या मानाच्या भक्तांनी ओढल्या. सातेफळ येथील रेणुका माता यांच्या यात्रा महोत्सव उत्साहात संपन्न झाला. तसेच प्रतिवर्षाप्रमाणे पान २ वर